


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. १२ मार्च २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १०५ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# छत्रपती संभाजीनगरकरांना युद्धाच्या झळा

## कर्मशियल सिलिंडर ब्लॅकमध्ये ३२०० वर, पुरवठा निम्म्यावर, केटरर्सकडून नवीन ऑर्डर बंद, व्यावसायिक संकटात

(समर्थ गांवकरी)

अमेरिका, इस्त्रायल विरुद्ध इराण युद्धाचे तीव्र पडसाद आता महाराष्ट्रात उमटू लागलेत. या युद्धाचा मोठा फटका थेट छत्रपती संभाजीनगरमधील हॉटेल व्यावसायिक, छोटे उद्योजक आणि रिक्षाचालकांना बसतोय. त्यामुळे शहराचे अर्थचक्र संकटात सापडले आहे. घरगुती गॅस ग्राहकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने नाशिक येथील गॅस डेपोतून दररोज सुमारे 150 टन एलपीजीचा पुरवठा सुरू ठेवला आहे. रुग्णालय आणि शाळांचा गॅस पुरवठा खंडित होणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. मात्र, प्रशासनाच्या या आश्वासनानंतरही नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, गॅस एजन्सीवर घरगुती ग्राहकांनी मोठी गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळतेय. कर्मशियल गॅसचा पुरवठा जवळपास होत नसल्याचे चित्र आहे. छत्रपती संभाजीनगरमधील या परिस्थितीचा दिव्य मराठी डिजिटलने ग्राउंड रिपोर्टमधून घेतलेला हा आढावा. गेल्या 12 दिवसांपासून सुरू असलेल्या या युद्धाचा सर्वाधिक फटका छोट्या हॉटेल उद्योजकांना बसला आहे. 1600 रुपयांना मिळणारा व्यावसायिक गॅस सिलेंडर आता 3200 रुपयांना 'ब्लॅक'ने घ्यावा लागत आहे, असे नाव न छापन्याच्या अटीवर एका व्यावसायिकाने सांगितले. तर अव्वाच्या सव्वा पैसे देऊनही गॅस मिळत नाहीये आणि गॅस महागला असला



तरी हॉटेलच्या मेन्यूचे दर वाढवता येत नसल्याने व्यावसायिक हतबल झालेत. "दोन दिवसात गॅस संपला तर हॉटेल बंद करण्याशिवाय पर्याय नाही, अशी खंत उद्योजकांनी व्यक्त केली.

मेसचालकांसमोर बाहेरगावच्या मुलांच्या जेवणाचा प्रश्न उभा ठाकला आहे. गॅसअभावी मेस बंद झाल्यास ग्रामीण भागातून शिक्षणासाठी आलेल्या तरुणांना गावी परत जावे लागेल किंवा त्यांच्यावर उपासमारीची वेळ येईल, अशी भीती व्यक्त होत आहे. एका ग्राहकाने तक्रार केली की, एक आठवड्यापूर्वी ऑनलाइन पैसे भरूनही गॅस मिळालेला नाही. एजन्सीचे फोन लागत नाहीत. एका महिलेने सांगितले की, गेल्या 3 दिवसांपासून बुकिंगसाठी संपर्क होत नाही. गॅसची गाडीही वस्तीत येत नाही.

### पर्यायी इंधनाचा वापर

हॉटेल लोकसेवाचे उद्योजक गणेश गांगवे यांनी हॉटेल व्यवसायातील वाढत्या इंधन खर्चावर आणि पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांवर एक महत्त्वाचा उपाय सुचवला आहे. त्यांच्या मते, हॉटेल व्यावसायिकांनी आता 'सस्टेनेबल एनर्जी' (शाश्वत ऊर्जा) कडे वळणे काळाची गरज बनली आहे. गांगवे सांगतात की, त्यांनी सुरुवातीपासूनच गॅसवरील अवलंबित्व कमी करून 'वुडन पॅलेट्स' आणि 'सोलर भट्टी'चा वापर सुरू केला आहे. अनेक मोठ्या हॉटेल्समध्ये अद्याप ही व्यवस्था नाही. कारण तिथे धुराची समस्या उद्भवते, तर नवीन वापरकर्त्यांना ही पद्धत सुरुवातीला थोडी कठीण वाटू शकते. मात्र, दीर्घकालीन विचार करता हे बदल अत्यंत फायदेशीर ठरतात. सध्या या क्षेत्रातील व्यवसायावर जवळपास 40 टक्के परिणाम झाला असून, त्यावर मात करण्यासाठी हॉटेल व्यावसायिकांनी छोट्या बायोगॅस प्लांटसारख्या पर्यायांचा वापर करून स्वयंपूर्ण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात...

### कंपन्या आणि कामगारांची नोंदणी

मुंबई (समर्थ गांवकरी) : स्विगी, झोमॅटो, ब्लिंकिट आदी कंपन्यांच्या माध्यमातून खाद्यपदार्थ तसेच अन्य वस्तू घरपोच पोहोचवणाऱ्या कामगारांना सामाजिक सुरक्षा मिळावी, त्याचप्रमाणे त्यांच्याविषयी नागरिकांना सुरक्षितता वाटावी, यासाठी सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या कामगारांसाठी राष्ट्रीय सुरक्षा महामंडळ स्थापन करण्यात येणार असून संबंधित कंपन्यांची आणि त्यांच्या कामगारांची नोंदणी करण्यासाठी केंद्रीय संकेतस्थळ तयार करण्यात येणार असल्याची घोषणा कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी बुधवारी विधान परिषदेत केली. गिग कामगारांच्या सामाजिक सुरक्षेच्या दृष्टीने अभिजित वंजारी यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. देशातील व राज्यातील कामगार कायद्यानुसार झोमेटो, स्विगी, ब्लिंकिट आदी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्यांना कामगार समजले जात नसल्याने त्यांना वेतनाची हमी नसणे, कंपनीकडून फसवणूक, कामावरून काढून टाकणे, अन्याय झाल्यास दाद मागता न येणे, अशा समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणली. त्यांच्या कामांच्या तासांची निश्चिती नसते, कामाच्या तासावर अन्यथा वितरणावर त्यांना मोबदला मिळतो. शिवाय या कामगारांची भरती त्रयस्थ कंपनीकडून होत असल्यामुळे काम करणारी कंपनी त्या गिग वर्कर्सच्या प्रश्नांना जबाबदार नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. यावेळी आमदार शशिकांत शिंदे, निरंजन डावखरे, मनीषा कायंदे आदींनी चर्चेत सहभाग घेतला.

### घरगुती, उद्योगांच्या वीजदरात कपात

मुंबई (समर्थ गांवकरी) : अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वीज दर अधिक असल्याची टीका होते. त्या पार्श्वभूमीवर घरगुती वापर आणि उद्योगांच्या वीजदरात कपात करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत बुधवारी केली. घरगुती वापरासाठी 100 युनिटपर्यंत पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने 26 टक्के दरात घट होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# मुख्य निवडणूक आयुक्तांना हटवण्याचा प्रस्ताव तयार

*लोकसभेतील १२०, राज्यसभेतील ६० खासदारांनी स्वाक्षऱ्या केल्या, आज संसदेत सादर केला जाऊ शकतो*

नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)

विरोधी पक्षांनी मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवण्यासाठी प्रस्ताव आणण्यासाठी खासदारांच्या सह्या गोळा केल्या आहेत. सूत्रांनुसार, हा प्रस्ताव गुरुवारी किंवा शुक्रवारी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये (लोकसभा आणि राज्यसभा) सादर केला जाऊ शकतो. एका वरिष्ठ खासदाराने सांगितले की, स्वाक्षऱ्या गोळा करण्याचे काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत लोकसभेत प्रस्ताव देण्यासाठी सुमारे 120 खासदारांनी आणि राज्यसभेत सुमारे 60 खासदारांनी या नोटिसवर सह्या केल्या आहेत. विरोधकांचा आरोप आहे की, मुख्य निवडणूक आयुक्त (CEC) अनेक प्रसंगी सत्ताधारी भाजपला फायदा पोहोचवण्यासाठी मदत करत आहेत,




विशेषतः स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन (SIR) नावाच्या मतदार यादीच्या पुनरावलोकन प्रक्रियेबाबत. विरोधकांचे म्हणणे आहे की, ही प्रक्रिया केंद्र सरकारला फायदा पोहोचवण्यासाठी केली जात आहे.

विशेषतः पश्चिम बंगालमध्ये या प्रक्रियेबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आरोप केला आहे की, निवडणूक आयोग खऱ्या मतदारांची नावे मतदार यादीतून वगळत आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांना त्याच पद्धतीने हटवले जाऊ शकते जसे सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना हटवले जाते. इतर निवडणूक आयुक्तांना हटवण्यासाठी मुख्य निवडणूक आयुक्तांची शिफारस आवश्यक असते.

न्यायाधीश (चौकशी) अधिनियम 1968 नुसार, जर दोन्ही सभागृहांमध्ये एकाच दिवशी नोटीस दिली गेली, तर चौकशी समिती तेव्हाच स्थापन होईल जेव्हा दोन्ही सभागृहांमध्ये प्रस्ताव स्वीकारला जाईल. त्यानंतर लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभा सभापती मिळून एक संयुक्त चौकशी समिती स्थापन करतील.

# विधानभवनाबाहेर तरुणाचा आत्मदहनाचा प्रयत्न

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या आठवड्यात सोलापूर येथील तरुणाने बुधवारी विधानभवनाबाहेरील परिसरात आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांच्या प्रसंगावधानामुळे यावेळी मोठा अनर्थ टळला. पोलिसांनी या तरुणाला तत्काळ ताब्यात घेतले.



सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील टाकळी येथील रहिवासी दादासाहेब बबन कलसैत (३८) हे बुधवारी सकाळी विधानभवनाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ आले. त्यानंतर सोबत आणलेल्या डब्यातील रॉकेल स्वतःच्या अंगावर ओतून घेतले. ते पेटवून घेण्याच्या तयारीत असतानाच तैनात पोलीस आणि सुरक्षा रक्षकांनी तातडीने धाव घेत त्यांच्या हातातील काडीपेटी हिसकावून घेतली. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र अचानक घडलेल्या प्रकारामुळे काहीकाळ तणावाचे वातावरण होते. घटनेनंतर पोलिसांनी कलसैत यांना ताब्यात घेतले. मरिन ड्राईव्ह पोलिसांनी केलेल्या चौकशीत जमिनीवर उभारलेला विश्वकर्माचा पुतळा नगरपंचायतीने अलीकडेच हटवला होता. यामुळे संतप्त झाल्याने त्यांनी हा टोकाचा निर्णय घेतला, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला. या प्रकरणी कलसैत यांच्याविरोधात कलम २२६ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती मरीन ड्राईव्ह पोलिसांनी दिली.

# वाघांचा मार्ग महत्त्वाचा, खाण प्रकल्पाला मान्यता नाही – वनमंत्री

मुंबई : (समर्थ गांवकरी)

चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी अभयारण्यातील लोहार डोंगरी भागात प्रस्तावित खाण प्रकल्पावरून वाद निर्माण झाला असतानाच या ठिकाणी खाण प्रकल्पाला सरकारने मान्यता दिलेली नाही. लोहार डोंगरी भागात जंगल आणि व्याघ्र प्रकल्पालाच सरकारचे प्राधान्य असून सरकार इथे खाण प्रकल्पाला भविष्यातही मान्यता देणार नाही, याविषयीचे म्हणणे न्यायालयात मांडण्यात येईल, असे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधान परिषदेत स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य वन्यजीव मंडळाने लोहार डोंगरी येथे लोहखनिज खाण प्रकल्पांबाबतचा प्रस्ताव राष्ट्रीय वन्यजीव मंडळाकडे पाठवला असून यासाठी सनफ्लॅग आयर्न ॲण्ड स्टील कोअर लिमिटेडने स्वारस्य दाखवले आहे. या प्रकल्पातून दरवर्षी १.१ दशलक्ष



टन लोहखनिज उत्पादन १२ वर्षांसाठी करण्याची तयारी संबंधित कंपनीकडून दाखविण्यात आली आहे. व्याघ्र प्रकल्पासाठी राखीव असलेल्या वह्मपुरी वनक्षेत्रात हा प्रकल्प होणार असल्याची बाब लक्षवेधी सूचनेद्वारे मिलिंद नार्वेकर यांनी निदर्शनास आणली. या प्रकल्पाला स्थगिती देण्यात यावी अशी मागणी त्यांनी केली.

# मुलगी सापडली नाही तर १९ मार्चपासून आमरण उपोषणाचा इशारा!

छत्रपती संभाजीनगर : (समर्थ गांवकरी)

शहरातील मिटमिटा परिसरातील गिरजा माता नगर येथील १७ वर्षीय मुलगी २३ फेब्रुवारी २०२६ पासून बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मुलगी शोधून देण्यात प्रशासनाने तत्काळ मदत करावी, अन्यथा १८ मार्च २०२६ पर्यंत मुलगी सापडली नाही तर १९ मार्चपासून आईसह मिटमिटा परिसरातील महिला आमरण उपोषणाला बसतील, असा इशारा मुलीच्या कुटुंबीयांनी दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मिटमिटा येथील गिरजा माता नगर येथे राहणाऱ्या कुटुंबातील १७ वर्षीय मुलगी दि. २३ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे एक वाजण्याच्या सुमारास घरातून अचानक बेपत्ता झाली. घरच्यांनी परिसरात जवळपास एक तास शोध घेतला; मात्र मुलगी कुठेही आढळून आली नाही. त्यामुळे कुटुंबीय घाबरले असून त्यांनी तातडीने छावणी पोलीस स्टेशन येथे



तक्रार दाखल केली. तक्रार दिल्यानंतर मुलीचा मोबाईल तपासण्यात आला असता तिच्या व्हॉट्सअॅप वर एका व्यक्तीकडून धमकीचे ऑडिओ संदेश आढळल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या संदेशांवरून राजू चव्हाण (मो. नं. ७३७८८३९००१) या व्यक्तीवर संशय व्यक्त करण्यात आला आहे. संबंधित व्यक्तीने मुलीला पळवून नेल्याचा कुटुंबीयांचा आरोप असून या प्रकरणात त्याच्या कुटुंबीयांचाही सहभाग असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

तसेच २५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास कुटुंबीयांच्या व्हॉट्सअॅपवर एक पत्रही आल्याचे सांगण्यात आले आहे. हे पत्र पोलिसांना देण्यात आले असून या प्रकरणात रोहित लग्गड, राहुल पाटील व साळवे नावाचे हॉटेल मालक यांना मुलगी कुठे ठेवली आहे याची माहिती असल्याचा संशयही कुटुंबीयांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, संशयित व्यक्ती पुणे जिल्ह्यातील आळंदी आणि चाकण परिसरात दिसल्याची माहिती मिळाल्यानंतर कुटुंबीयांनी सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या मदतीने तेथे जाऊन स्थानिक पोलिसांकडेही तक्रार नोंदवली आहे. तरीदेखील अद्याप मुलीचा काहीही ठावठिकाणा लागलेला नाही.

या घटनेमुळे मुलीच्या वडिलांची प्रकृती तणावामुळे बिघडल्याचे कुटुंबीयांनी सांगितले आहे. मुलगी सुरक्षित परत मिळावी यासाठी कुटुंबीय प्रशासनाकडे मदतीची विनंती करत आहेत.

“आमची मुलगी १८ मार्च २०२६ पर्यंत सापडली नाही तर १९ मार्चपासून मी आणि मिटमिटा परिसरातील महिला आमरण उपोषणाला बसू. माझी मुलगी माझ्या डोळ्यासमोर येईपर्यंत उपोषण सुरू ठेवू,” असा इशारा मुलीच्या आईने दिला आहे. तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही कुटुंबीयांनी प्रशासनाकडे केली आहे.

# कर्जत तालुक्यात अफूची शेती; ४७ लाख ६४ हजारांचा मुद्देमालासह आरोपी जेरबंद

## अहिल्यानगर स्थानिक गुन्हे शाखा व कर्जत पोलिसांची संयुक्त कारवाई

कर्जत : (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर - सोलापूर महामार्गावरील कर्जत तालुक्यातील चापडगाव येथे प्रतिबंधित अफूच्या गवताची कांद्याच्या शेतात लागवड करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर आणि कर्जत पोलिसांनी संयुक्त कारवाई करत जेरबंद केले. या कारवाईत आरोपीच्या शेतातून तब्बल 47 लाख 64 हजार 180 रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात अंमली पदार्थांची लागवड व विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले आहेत. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक सक्रिय झाले होते. याबाबत कबाडी यांनी अंमली पदार्थ विक्री, सेवन व अफू लागवड करणारे इसमांची माहिती काढून कारवाई करण्याबाबत पोलिस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, समीर अभंग, पोलिस अंमलदार दिपक घाटकर, विजय पवार, अतुल लोटके, संतोष खैरे, अमृत आढाव, चालक उत्तरेश्वर मोराळे, अर्जून बडे यांना रवाना केले.

सदर पथक कर्जत पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाबबण माहिती घेत असताना पथकास गुप्त बातमीदारामार्फत परमेश्वर बन्सी घनवट (वय 68, रा. चापडगाव ता. कर्जत) हा आपल्या शेतात शासनाने प्रतिबंधित असलेल्या अफूच्या झाडांची लागवड करून त्याची निगा राखत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कर्जत पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना माहिती देत संयुक्त कारवाईचा निर्णय घेतला.

त्याअनुषंगाने कबाडी यांनी कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या.

त्यानुसार पथकाने कर्जत पोलिस



स्टेशनला जाऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांना मिळालेल्या बातमीचा लेखी रिपोर्ट दिला. असता, सहायक पोलीस निरीक्षक विजय झंजाड व पोलीस अंमलदार संजय सानप, किरण जाधव, सचिन थोरात यांच्या पथकासह चापडगाव शिवारातील शेती गट क्रमांक 13 मधील शेतावर छापा टाकण्यात आला. तेथे आरोपी शेतात राखण करताना आढळून आला. चौकशीदरम्यान त्याने दोन ते तीन महिन्यांपूर्वी अफूचे गवत शेतात लावून त्याची जोपासना करत असल्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीच्या शेतातून तब्बल 238.239 किलो वजनाची अफूची झाडे जप्त केली असून त्याची अंदाजे किंमत 47 लाख 64 हजार 180 रुपये असल्याचे सांगितले जात आहे.

या प्रकरणी आरोपीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस नाईक श्यामसुंदर जाधव यांच्या फिर्यादीवरून कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 93/2026 गुंगीकारक औषधिद्रव्ये आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ कायदा 1985 अंतर्गत कलम 8(क) आणि 15(क) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास कर्जत पोलीस करत आहेत.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि कर्जत विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा आणि कर्जत पोलीस ठाण्याच्या पथकाने केली.

# अंबड येथे मान्यवरांचा भव्य सत्कार सोहळा

- ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीने गाव दुमदुमले!
- विद्यार्थ्यांना बाहेरगावी जावे लागू नये म्हणून शिक्षण संस्था उभारल्या – सिताराम पाटील गायकर
- डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या जीवनगौरव पुरस्कारानिमित्त अंबडमध्ये त्यांचा भव्य सत्कार!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील अंबड येथे विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमानिमित्त गावातून ढोल-ताशांच्या गजरात आणि विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाच्या आकर्षक सादरीकरणासह भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक आणि विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण गावात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार महर्षी तथा सेवानिवृत्त प्राध्यापक आणि अर्थवेध पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. बी. एम. महाले होते. व्यासपीठावर अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सहकार महर्षी सितारात पाटील गायकर, जनलक्ष्मी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊ पाटील नवले, अकोले तालुका एज्युकेशन संस्थेचे कार्यकारिणी सदस्य यशवंत आभाळे, संस्थेचे अध्यक्ष इंजिनिअर सुनील दातीर, सचिव सुधाकर देशमुख, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक कचरू पाटील शेटे, अगस्ती पतसंस्थेचे अध्यक्ष अशोकराव देशमुख, सेवानिवृत्त मुख्याध्यापक विलास महाले, एस. पी. मालुंजकर, केशव नाईकवाडी आदी मान्यवर उपस्थित होते.

या सोहळ्यात अकोले तालुक्यातील दानशूर भूमिपुत्र सुरेश कोते, माणिकराव देशमुख, थोर दानशूर भूमिपुत्र संतोष भोर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांना मिळालेल्या जीवनगौरव पुरस्काराबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच केळवड येथील सामाजिक कार्यकर्ते प्रा. लक्ष्मण गोरडे, अंबिका विद्यालयाचे शिक्षक कैलास कोते, अकोले महाविद्यालयाचे प्राचार्य भास्कर शेळके आणि तालुका आदर्श शेतकरी पुरस्कारप्राप्त ताराबाई भागवत जाधव यांचाही ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. या मान्यवरांनी विविध क्षेत्रांत केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे त्यांचा सत्कार करताना ग्रामस्थांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी बोलताना अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सिताराम पाटील गायकर म्हणाले की, ग्रामीण भागात शिक्षणाची दारे उघडण्याचे मोठे कार्य अंबड गावातील अंबिका माध्यमिक विद्यालयामुळे शक्य झाले आहे. या विद्यालयाच्या स्थापनेमुळे गावातील आणि परिसरातील अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली. आज या गावातील अनेक भूमिपुत्र देशाच्या विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत, ही बाब अंबड गावासाठी आणि संपूर्ण अकोले तालुक्यासाठी अभिमानाची आहे.

ते पुढे म्हणाले की, अकोले तालुका एज्युकेशन संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात शिक्षणाची दारे उघडण्यात आली. पूर्वी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी दूरच्या शहरांमध्ये जावे लागत होते. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहायचे. मात्र हा प्रश्न सोडवण्यासाठी संस्थेने सातत्याने प्रयत्न करून ग्रामीण भागात शैक्षणिक संस्था उभारल्या. त्यामुळे आज ग्रामीण विद्यार्थ्यांना आपल्या गावाजवळच शिक्षणाची संधी उपलब्ध झाली आहे.

जनलक्ष्मी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊ पाटील नवले यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अंबिका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गिरीजाजी जाधव यांनी तालुक्याच्या राजकारणात तसेच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. त्यांचे कार्य अनेकांसाठी प्रेरणादायी आहे. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. अंबड गावातील शिक्षण संस्था अधिक सक्षम व्हावी यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अंबिका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गिरीजाजी जाधव यांनी प्रास्ताविक करताना संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. अंबिका विद्यालयाची स्थापना, त्यामागील उद्दिष्टे आणि ग्रामीण विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाचे स्वागत अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक सुधीर कानवडे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन अंबड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या भव्य सत्कार सोहळ्यामुळे अंबड गावात उत्साहाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले. गावातील मान्यवरांचा गौरव होताना ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला आणि कार्यक्रम यशस्वी केला.

## रमाई घरकुल योजने पासून पेडगावचे सुमारे ४० लाभार्थी वर्षभरापासून वंचित; उपोषणाचा इशारा!



**मंगरूळपीर: (समर्थ गांवकरी)**

पेडगाव येथील जवळपास ४० गरजू लाभार्थी गेल्या एक वर्षापासून रमाई घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित असल्याची तक्रार समोर आली आहे. या संदर्भात सर्व आवश्यक कागदपत्रांसह फाईल एक वर्षापूर्वी सादर करण्यात आली होती. मात्र आजपर्यंत या प्रकरणात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप लाभार्थ्यांकडून करण्यात आला आहे. या बाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करूनही केवळ टाळाटाळीची उत्तरे मिळत असल्याची नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. पेडगाव येथील गरजू नागरिकांना लवकरात लवकर घरकुलाचा लाभ मिळावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. येत्या आठ दिवसांच्या आत रमाई घरकुल योजनेबाबत ठोस निर्णय घेऊन घरकुलाचा मार्ग काढण्यात यावा, अन्यथा पेडगाव येथील सर्व लाभार्थी पंचायत समिती, मंगरूळपीर येथे आमरण उपोषणास बसतील, असा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

## विविध विषयांवरील पुस्तकांचे प्रदर्शन

**पुणे: (समर्थ गांवकरी)**

पुणे आणि आजूबाजूच्या परिसरातील वाचनप्रेमींसाठी एक आनंदाची बातमी आहे. उत्कृष्ट बुक सर्विसतर्फे विविध प्रकारच्या पुस्तकांचे प्रदर्शन सुरु करण्यात आले आहे.या प्रदर्शनामध्ये जुनी आणि नवीन अशा दोन्ही प्रकारची पुस्तके उपलब्ध असून मराठी, इंग्रजी,धार्मिक,इतिहास आणि विविध विषयांवरील पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत.अशी माहिती प्रकाशनाचे प्रमुख सुधाकर जोशी यांनी सांगितली. डेक्कन जिमखान्यावरील दुकानामध्ये प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून ते सर्वांसाठी उपलब्ध असणार आहे. प्रदर्शनामध्ये पुस्तकांची आकर्षक पद्धतीने विषयावर वर्गीकरण करून मांडणी करण्यात आली आहे.

## बिपिनराव गायकवाड यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत!





**कोपरगाव : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई शाखा कोपरगावचे शहर कार्याध्यक्ष पत्रकार बिपिनराव गायकवाड यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने बुधवार, दि. ४ मार्च रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या अकाली निधनामुळे पत्रकार क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे व प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी यांच्या सूचनेनुसार राज्य सरचिटणीस तथा 'दैनिक समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी बुधवार, दि. ११ मार्च रोजी कोपरगाव येथे गायकवाड यांच्या निवासस्थानी भेट देत कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबई तसेच 'दैनिक समर्थ गांवकरी'च्या वतीने पत्रकार बिपिनराव गायकवाड यांच्या पत्नी कविता बिपिन गायकवाड यांना आर्थिक मदतीचा धनादेश आणि एक महिन्याचे घरगुती किराणा साहित्य सांत्वन म्हणून प्रदान करण्यात आले. या प्रसंगी 'दैनिक समर्थ गांवकरी'चे व्यवस्थापक संजय फुलसुंदर, राज्य मराठी पत्रकार संघाचे कोपरगाव तालुका अध्यक्ष जनार्दन जगताप, सचिव विजय कापसे, ज्येष्ठ मार्गदर्शक फकीरराव टेके, किसनराव पवार यांच्यासह गायकवाड कुटुंबातील कविता गायकवाड, महेश बिपिन गायकवाड, कल्याणी बिपिन गायकवाड, जागृती बिपिन गायकवाड, प्रकाश बन्सी गायकवाड आदी सदस्य उपस्थित होते. यावेळी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी गायकवाड कुटुंबीयांचे सांत्वन करताना सांगितले की, पत्रकार बिपिनराव गायकवाड हे अत्यंत मनमिळावू, शांत स्वभावाचे आणि अभ्यासू पत्रकार होते. त्यांनी अल्पावधीतच आपल्या कार्यातून वेगळी ओळख निर्माण केली होती. संघटनेत सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची त्यांची कार्यपद्धती होती. त्यांच्या अचानक निधनामुळे पत्रकार क्षेत्राची मोठी हानी झाली असून गायकवाड कुटुंबाला या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो, अशी भावना व्यक्त करत त्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

*आयेशा फाउंडेशन ट्रस्ट व शेठ एन. के. टी. ट्रस्ट यांच्या वतीने महिला दिनानिमित्त*

## मालाडमध्ये साडी व धान्य वाटपाचा सामाजिक उपक्रम!





**मालाड : (समर्थ गांवकरी)**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयेशा फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने तसेच शेठ एन. के. टी. ट्रस्ट यांच्या सहकार्याने मालाड येथे गरजू महिलांसाठी साडी व धान्य वाटपाचा सामाजिक उपक्रम उत्साहात पार पडला. समाजातील गरजू महिलांना मदत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नजमा खान होत्या. त्यांच्या हस्ते तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत परिसरातील अनेक गरजू महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी आसिम खान तसेच परिसरातील महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमादरम्यान महिलांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. महिलांचा सन्मान आणि त्यांच्या सक्षमीकरणाचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. समाजातील गरजू घटकांना मदत करण्यासाठी भविष्यातही अशा प्रकारचे सामाजिक उपक्रम सातत्याने राबविण्यात येतील, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाला उपस्थित महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपक्रमाचे स्वागत केले. सामाजिक बांधिलकी जपत महिलांच्या सन्मानासाठी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## ९५ सहकारी पतसंस्था सहकार विभागाच्या रडारवर

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील नागरी बिगर कृषी सहकारी पतसंस्थांची आर्थिक स्थिती आता राज्याच्या डॅशबोर्डवर उपलब्ध झाली असून यात माहिती सादर न करणाऱ्या पतसंस्था आता सहकार विभागाच्या रडारवर आल्या आहेत. यात नगर जिल्ह्यातील २ हजार २८ पतसंस्थांपैकी ९५ संस्थांनी आपली माहिती भरलेली नाहीत. पतसंस्थेतील कर्जाची थकबाकी, कर्ज वितरण, सभासदांची संख्या याबाबत कोणतीही माहिती सादर न केल्याने या पतसंस्थांवर आता अवसायनाची कारवाई करण्याचे संकेत सहकार विभागाने दिले आहेत. राज्यातील सर्व २० हजार पतसंस्थांची माहिती एकत्र करण्यासाठी सहकार विभागाने स्वतंत्र पोर्टल तयार केले असून या सर्व पतसंस्थांना आपली माहिती या पोर्टलवर अपलोड करण्यास सांगितले होते.

## बनाई देवी यात्रा उत्सव २१ते २४ मार्च दरम्यान होणार

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



- यात्रेची तयारी अंतिम टप्प्यात

तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील जागृत ग्रामदैवत माता बनाई देवी यात्रा उत्सव यंदा उत्साहात साजरा होणार आहे. पंचक्रोशीतील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेल्या या देवस्थानाची यात्रा दरवर्षीप्रमाणे गुढीपाडव्याच्या तिसऱ्या दिवसापासून सुरू होत आहे. यंदा दि. २१ ते २४ मार्च २०२६ या कालावधीत विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यासाठी श्री बनाईदेवी सार्वजनिक यात्रा उत्सव कमिटीच्या नवीन कार्यकारिणीची नियोजन बैठक पार पडली. यात यात्रा यशस्वी करण्यासाठीचे नियोजन अंतिम स्वरूप देण्यात आले. कमिटीचे अध्यक्ष संपतराव तराळ, उपाध्यक्ष संजय खिलारी (मेजर) यांच्या नेतृत्वाखाली ही तयारी जोमाने सुरू आहे. यात्रेचे प्रमुख कार्यक्रम खालीलप्रमाणे आहेत: शनिवार, दि. २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता हजरत शादवल शाह र.ह. / फकिरबाबा संदलचा कार्यक्रम होईल. रविवार, दि. २२ मार्च रोजी सकाळी ८ वाजता बनाईदेवी काठी मिरवणूक, रात्री ८ वाजता छबीना मिरवणूक तर रात्री १० वाजता लोकनाट्य तमाशाचे सादरीकरण होईल. सोमवार, दि. २३ मार्च रोजी सकाळी ८ वाजता मळगंगादेवी काठी मिरवणूक, दुपारी ४ वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा, रात्री ८ वाजता छबीना तर रात्री १० वाजता ऑर्केस्ट्रा कार्यक्रम असेल.

मंगळवार, दि. २४ मार्च रोजी सकाळी ८ वाजता मुक्ताईदेवी काठी मिरवणूक, रात्री ८ वाजता मुक्ताईदेवी छबीना व रात्री १० वाजता ऑर्केस्ट्रा होईल. तसेच २४ व २५ मार्च रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत बैलगाड्यांच्या भव्य शर्यती आयोजित आहेत.

याशिवाय संपूर्ण यात्रेत फटाके व दारुगोळ्याची भव्य आतीशबाजी पाहायला मिळेल. हा उत्सव सर्वधर्मीयांच्या एकतेचे प्रतीक असून, हजारो भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. कमिटीने सर्वांनी सहभागी होऊन यात्रा यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

## १४ मार्च रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

महसूल प्रशासनाला अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी आणि सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे दैनंदिन प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी शासनातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा-१' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत शनिवारी, १४ मार्च २०२६ रोजी मंडळ स्तरावर या विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर यांनी केले आहे. येत्या १४ मार्च रोजी ही विशेष शिबिरे विविध तालुक्यांतील निश्चित केलेल्या मंडळ स्तरांवर पार पडणार आहेत. यामध्ये कोपरगाव तालुक्यातील रवंदे, राहाता तालुक्यातील अस्तगाव, संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी, अकोले तालुक्यातील समशेरपूर, श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर व राहुरी तालुक्यातील बारागाव नांदूर या ठिकाणांचा समावेश आहे. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना शासनाच्या विविध सेवा व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मार्च ते मे या कालावधीत संपूर्ण राज्यात या अभियानांतर्गत शिबिरे घेतली जाणार आहेत. एप्रिल महिन्यात १० आणि १७ एप्रिल २०२६ रोजी मंडळ स्तरावर, तर मे महिन्यामध्ये ८ आणि १५ मे २०२६ रोजी नगरपरिषद व नगरपंचायत पातळीवर शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या समाधान शिबिरामध्ये 'एक खिडकी' प्रणाली राबविली जाणार असून, सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपस्थित राहून नागरिकांना त्वरित सेवा देतील.

# मध्यपूर्वेतील संघर्षामुळे एलपीजी तुटवड्याची भीती

- इराण तणावामुळे गॅस बाजार अस्थिर; भारतात चिंता वाढली!
- हॉर्मुझ सामुद्रधुनीतील तणावाचा फटका; गॅस पुरवठ्यावर परिणाम!

**(समर्थ गांवकरी)**






**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

मध्यपूर्वेत वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या एलपीजी गॅसच्या पुरवठ्यावर दबाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विशेषतः इराण संबंधित संघर्षामुळे मध्यपूर्वेतील ऊर्जा वाहतुकीवर परिणाम होत असून त्याचा प्रभाव भारतासह अनेक देशांच्या इंधन पुरवठ्यावर पडत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

भारत आपल्या गरजेपैकी मोठ्या प्रमाणात एलपीजी गॅस आयात करतो आणि त्यातील मोठा हिस्सा मध्यपूर्वेतील देशांकडून येतो. त्यामुळे या प्रदेशात युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाल्यास किंवा तणाव वाढल्यास ऊर्जा पुरवठा साखळीवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते.

माहितीनुसार, मध्यपूर्वेतील अत्यंत महत्त्वाचा समुद्री मार्ग असलेल्या हॉर्मुझ सामुद्रधुनी येथे जहाज वाहतुकीत अडथळे निर्माण झाल्याने तेल व गॅस वाहतुकीवर परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे. जगातील मोठ्या प्रमाणातील कच्चे तेल आणि एलपीजी याच मार्गाने विविध देशांपर्यंत पोहोचवले जाते. त्यामुळे येथे निर्माण झालेला तणाव जागतिक ऊर्जा बाजारासाठी चिंतेचा विषय मानला जात आहे.

याचा परिणाम भारतातील काही शहरांमध्ये आधीच जाणवू लागल्याचे वृत्त आहे. विशेषतः व्यावसायिक वापरासाठी असलेल्या गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात काही ठिकाणी अडथळे निर्माण झाले आहेत. हॉटेल, रेस्टॉरंट तसेच लहान उद्योगांमध्ये गॅस मिळण्यात विलंब होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. काही ठिकाणी हॉटेल व्यावसायिकांनी मेन्यू मर्यादित केला असून काही उद्योगांना उत्पादन कमी करावे लागल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, केंद्र सरकारने उपलब्ध गॅसचा पुरवठा प्राधान्याने घरगुती ग्राहकांना देण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे व्यावसायिक सिलिंडरची उपलब्धता काही भागांत मर्यादित झाल्याचे दिसून येत आहे. सरकारकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात असून ऊर्जा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

ऊर्जा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, जर मध्यपूर्वेतील संघर्ष दीर्घकाळ सुरू राहिला तर जागतिक बाजारात तेल आणि गॅसच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. भारतासारख्या आयात अवलंबून असलेल्या देशांवर त्याचा थेट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे गॅस सिलिंडरच्या किमती वाढण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. तथापि, सरकारकडून सध्या देशात इंधनाचा तुटवडा नसल्याचे स्पष्ट करण्यात आले असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तरीही मध्यपूर्वेतील घडामोडींवर भारतासह संपूर्ण जगाचे लक्ष लागले असून पुढील काही दिवस ऊर्जा बाजारासाठी महत्त्वाचे ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# 'गोमाता' सहकारी दूध उत्पादक संस्थेचा रौप्य महोत्सव थाटामाटात साजरा

## गोमाता दुग्धालय, अद्ययावत पाश्चरायझेशन व होमोजिनायझेशन नवीन प्रकल्पाचा शुभारंभ

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील अग्रगण्य मानल्या जाणाऱ्या 'गोमाता सहकारी दूध उत्पादक संस्थेने आपल्या यशाची २५ वर्षे पूर्ण केली आहेत. या रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून संस्थेच्या वतीने नूतन कार्यालय, गोमाता दुग्धालय, तसेच अद्ययावत पाश्चरायझेशन व होमोजिनायझेशन प्रकल्पाचे उद्घाटन नुकतेच विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर , दुध संघाचे संचालक बाळासाहेब खिल्लारी व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात पार पडले. या नवीन प्रकल्पांमुळे परिसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रगतीला नवी दिशा मिळणार असल्याचे



संस्थेचे विद्यमान चेअरमन गणेश मारुती वाघमारे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

गेल्या अडीच दशकांपासून 'गोमाता' दूध संस्थेने आळेफाटा आणि परिसरातील ग्रामीण अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान दिले आहे. संस्थेचे संस्थापक कै. भिमाजीशेठ गडगे यांनी लावलेल्या या रोपट्याचा आज मोठा वटवृक्ष झाला असून, त्यांचा वारसा संस्थेचे विद्यमान चेअरमन गणेश वाघमारे,आणि त्यांचे सर्व संचालक मंडळ अतिशय समर्थपणे पुढे चालवत आहेत. केवळ दूध संकलन करण्यावरच न थांबता, दुधावर प्रक्रिया करून त्याचे मूल्यवर्धन करण्याच्या उद्देशाने हा नवीन प्रकल्प चेअरमन गणेश वाघमारे आणि सर्व संचालक मंडळाच्या पुढाकाराने सुरू करण्यात आला आहे अशी माहिती संस्थेचे सचिव अभिषेक कोकाटे यांनी दिली.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या पाश्चरायझेशन व होमोजिनायझेशन प्रकल्पामुळे दुधाची गुणवत्ता आणि टिकवणक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे दूध थेट ग्राहकांपर्यंत शुद्ध स्वरूपात पोहोचवण्यासाठी हे तंत्रज्ञान अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे दुग्धजन्य पदार्थांच्या निर्मितीलाही वेग येणार असून, परिसरातील तरुणांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या या दूरदृष्टीचे आणि पारदर्शक कारभाराचे विशेष कौतुक करत.

संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्त बोलताना पदाधिकाऱ्यांनी सांगितले की,"शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या दुधाला योग्य भाव मिळवून देणे आणि त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणे हेच संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे. नवीन प्रकल्पामुळे दूध प्रक्रिया क्षेत्रात संस्था आपले वेगळे स्थान निर्माण करेल."

यावेळी संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेताना सांगण्यात आले की, पारदर्शक कारभार आणि दुधाची उच्च गुणवत्ता यामुळेच 'गोमाता' ब्रँडने ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. आर्थिक स्थैर्य प्राप्त झाल्यामुळे आता संस्था पुढील काळात आणखी नवनवीन उपक्रम राबवण्याच्या तयारीत असल्याचे यावेळी आपल्या मनोगतात बोलताना वाघमारे यांनी सांगितले . या रौप्यमहोत्सवा निमित्त वासरांच्या स्पर्धात्मक मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यातील विजेत्या कालवडींना ट्रॉफि व रोख बक्षिसे देण्यात आली.

या सोहळ्याला राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने जि. प.सदस्य मंगेश काकडे, अनंतराव चौगुले,विलास कवडे, नेताजी दादा डोके,उपसरपंच गणेश भुजबळ , व्हा. चेअरमन गणेश देवकर , संचालक गणेश देवकर , विलास गडगे, संदीप गडगे, गोपाळ फुलसुंदर, रेश्मा चौगुले , सविता शिंदे , दिपक गडगे , बाळासाहेब गडगे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी मेजर रमेश खरमाळे, डॉ. सदानंद राऊत , अशोकशेठ गडगे, सौ. रजनी डुंबरे / कुऱ्हाडे मॅडम व डॉ. संजय देवकर यांना गोमाता कृतज्ञता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच माजी संचालक व ज्येष्ठ सभासदांना फेटा शाल व ट्रॉफी देवून गौरविन्यात आले. प्रास्ताविक संस्थेचे संचालक श्री. सुरेश भिमाजीशेठ गडगे यांनी तर श्री अशोक सिताराम गडगे यांनी आभार मानले..

# पायी दिंडी सोहळ्याचे उत्साहात स्वागत

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे श्री क्षेत्र बुवाजी बाबा देवस्थान डिग्रस (ता. संगमनेर) ते श्री बाबीर महाराज देवस्थान रुई (ता. इंदापूर, जि. पुणे) या पारंपरिक पायी दिंडी सोहळ्याचे भव्य स्वागत करण्यात आले. गेल्या ३७ वर्षांपासून सुरू असलेल्या या दिंडीत सुमारे २,५०० ते ३,००० भाविक सहभागी होत असतात.

या दिंडीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे या यात्रेत केवळ पुरुष भाविक सहभागी होतात, महिलांचा सहभाग नसतो. ही दिंडी ९ मार्च २०२६ रोजी डिग्रस येथून प्रस्थान झाली असून १७ मार्च २०२६ रोजी रुई येथे पोहोचणार आहे.

दिंडीच्या प्रत्येक मुक्कामावर विविध महाराजांच्या हस्ते कीर्तन सेवा आयोजित केली जाते. तसेच दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने भाविकांसाठी सकाळचा चहा-



नाश्ता, दुपारचे व सायंकाळचे जेवण यांची व्यवस्था करण्यात येते.

टाकळी ढोकेश्वर येथे दिंडीचे आगमन होताच गाजदीपूर (ता. पारनेर) येथील धनगर बांधवांसह स्थानिक ग्रामस्थांनी पुष्पवृष्टी करून भाविकांचे स्वागत केले. यावेळी भाविकांनी दर्शन घेतले तसेच सायंकाळच्या भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली.

या स्वागत सोहळ्यात लिंबाजी जिजाबा तीखोळे, बाबुराव जिजाबा तीखोळे, दत्तोबा नामदेव तीखोळे, भिवा बाबू तीखोळे, अंकुश बाळू ढेकळे, मारुती संभा तीखोळे, ज्ञानेश्वर विठोभा तीखोळे, सिताराम नामदेव तीखोळे, कांताराम दगडू नारनर, रोडिबा बबन करगळ, सोपान बाबू तीखोळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

सायंकाळी मुक्कामस्थळी महाआरती घेण्यात आली. या प्रसंगी निलेशजी लंके प्रतिष्ठानचे तालुका उपाध्यक्ष रवींद्रशेठ राजदेव उपस्थित होते. त्यांनी पारनेर तालुक्याच्या वतीने दिंडीतील भाविकांना शुभेच्छा दिल्या. मंगळवारी दिंडीचे पुढील प्रस्थान होणार असून पुढील मुक्काम राळेगणसिद्धी येथे असेल. ही दिंडी भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक ऐक्याचे उत्तम उदाहरण असल्याचे भाविकांनी सांगितले.



# घरात दुःखद निधनानंतर सुद्धा दिला पेपर

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील कांडवेल येथिल स्वर्गिय जिजाबाई रघुनाथ भवरे वय ६० यांचे रात्री हृदय विकाराच्या तिव्र झटकाने निधन झाले गावात व घरात शोककळा असतांना त्यांची नात सानिका हिचा सकाळी १० वीचा पेपर होता परंतु नियतीचा खेळच वेगळा असतो घरात दुःखद घटना घडली असतांना सुद्धा आश्रु पुर्ण नयनांनी लावली परिक्षा केंद्रावर हजेरी त्यामुळे तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# ॲड. एम.एन.देशमुख महाविद्यालयात राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

सत्यनिकेतन संस्थेचे ॲड्. एम.एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर येथे दि.१३ व १४ मार्च २०२६ रोजी " उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास " या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले असून या चर्चासत्रात पंजाब, राजस्थान,कर्नाटक,उत्तर प्रदेश,गुजरात या राज्यातून प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ.बी.वाय देशमुख यांनी दिली आहे. या दोन दिवसीय सेमिनार मध्ये "उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास "या विषयावर तज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार असून, उच्च शिक्षणाची दिशा निश्चित करणे व शैक्षणिक वातावरणाला गती देणे हा या सेमिनार आयोजन मागील मुख्य हेतू आहे.

या चर्चासत्राचा उद्घाटन



समारंभ दि.१३ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वा. सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष अॅड् मनोहरराव देशमुख ,आमदार डॉ.किरणजी लहामटे, सत्यनिकेतन संस्थेचे

सचिव एम.एल. मुठे,प्रोफेसर डॉ. सोमनाथ गंडाल ( राजस्थान)यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.या चर्चासत्र कालावधीत कुलसचिव चारुशिला गायके, सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, साधन व्यक्ती म्हणून डॉ. प्रमोद पाब्रेकर, डॉ.अशोक पवार (संभाजीनगर), कोषाध्यक्ष विवेकजी मदन सत्यनिकेतन संस्थेचे संचालक, माजी सचिव टी.एन. कानवडे, मा.प्राचार्य, डॉ. विलास आवारी, सिनेट सदस्य, सोलापूर विद्यापीठ डॉ. नितीन तळपाडे, डॉ .सुरेश देवरे,एम. एन. खर्डे, अध्यक्ष,वनस्पतीशास्त्र विभाग,प्राचार्य राजधर टेमकर,अध्यक्ष राज्यशास्त्र विभाग,आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

"ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे ज्ञान आणि विचारवंतांचे मार्गदर्शन मिळावे,यासाठी महाविद्यालयाने या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले असून या राष्ट्रीय चर्चासत्रात अभ्यासकांनी सहभागी व्हावे. संशोधकांनी आपले शोधनिबंध विहित मुदतीत सादर करावेत,असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, समन्वयक, सर्व विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रयत्नशील आहेत.

# ४० विद्यार्थ्यांची एल अँड टी प्रिसिजन इंजिनिअरिंग अँड सिस्टिम्समध्ये निवड



**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलिटेक्निक,बेल्हे येथे नामांकित एल अँड टी प्रिसिजन इंजिनिअरिंग अँड सिस्टिम्स,तळेगाव या कंपनीचा ऑल कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह मोठ्या उत्साहात पार पडला. या प्लेसमेंट ड्राइव्हला जुन्नर व संगमनेर तालुक्यातील विविध तंत्रनिकेतन महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कॅम्पसमध्ये सुमारे १७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये जयहिंद पॉलिटेक्निक, कुरण,समर्थ पॉलिटेक्निक बेल्हे,फॅकल्टी ऑफ पॉलिटेक्निक अकोले या तंत्रनिकेतन महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले होते. कंपनीकडून विद्यार्थ्यांची अप्टिट्यूड टेस्ट व टेक्निकल इंटरव्ह्यू घेऊन अंतिम निवड प्रक्रिया पार पडली. या निवड प्रक्रियेसाठी कंपनीकडून हरीश कोदरे (AGM), महेंद्र रटाटे (मॅनेजर), पुष्पराज मेंगडे (मॅनेजर), अक्षय बेल्हेकर (HR ऑफिसर) आणि राहुल पठारे (ऑफिसर) यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली व संपूर्ण निवड प्रक्रिया पार पाडली. समर्थ पॉलिटेक्निक, बेल्हे मधून चेतन इंदोरे, श्रीरंग आहेर, यश चिंचवडे, आदित्य लोंढे, नितेश दरेकर, प्रसाद गुंजाळ, साक्षी नाबगे, श्रावणी दारोटे, येतेश देशमुख, ज्ञानेश्वरी अदक, ज्ञानेश्वर रोकडे, विवेक कुरकुटे, ओमकार अदक, रुपेश लोखंडे, विवेक लोहकरे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

त्याचप्रमाणे जयहिंद पॉलीटेक्निकच्या २२,अकोले पॉलिटेक्निक च्या ३ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊलीशेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,जिल्हा परिषद माजी सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर राजीव सावंत,समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ.अनिल कपिले,उपप्राचार्य प्रा.संजय कंधारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्लेसमेंट प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी समर्थ संकुलाचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा.सचिन पोखरकर,समर्थ पॉलिटेक्निकचे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट इन्चार्ज प्रा.संकेत विघे सर,अकॅडमिक कॉर्डिनेटर प्रा. श्याम फुलपगारे,डॉ.नंदकिशोर मुऱ्हेकर,मेकॅनिकल विभाग प्रमुख प्रा.महेंद्र खटाटे,इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभाग प्रमुख प्रा.आदिनाथ सातपुते,मेकॅट्रॉनिक्स विभाग प्रमुख प्रा.संदीप त्रिभुवन,इलेक्ट्रिकल विभाग प्रमुख प्रा.आशिष झाडोकार,कॉम्प्युटर विभाग प्रमुख प्रा.स्वप्नील नवले आदी प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले. या कॅम्पस प्लेसमेंटमुळे नामांकित कंपनीत करिअरची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून संस्थेच्या उत्कृष्ट प्लेसमेंट परंपरेला पुन्हा एकदा उजाळा मिळाला आहे.

# सेवावृत्तीचा निरोप समारंभ

**कळवण: (समर्थ गांवकरी)**

कळवण पोलीस दलात कर्तव्यदक्ष, लोकाभिमुख आणि माणुसकी जपणारे अधिकारी म्हणून ज्यांचे नाव आदराने घेतले जाते असे बबनराव पाटोळे आज दीर्घ सेवेनंतर पोलीस खात्यातून सेवानीवृत्त होत आहेत. त्यांच्या निवृत्तीमुळे कळवण तालुक्यातील नागरिकांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले असून, "कडक शिस्तीचा पण मायेचा अधिकारी" अशी त्यांची ओळख सर्वसामान्यांच्या मनात कोरली गेली आहे. पोलीस दलात काम करताना अनेक अधिकारी कायद्याची अंमलबजावणी करतात; मात्र लोकांच्या मनात घर करणारे अधिकारी फार थोडे असतात. बबनराव पाटोळे हे त्यापैकी एक मानले जातात. तालुक्यातील उद्योगपती, व्यापारी, शेतकरी, तरुण तसेच सर्वसामान्य नागरिक त्यांना आपलेसे मानत.

# जि.प.प्राथमिक शाळेला फिनोलेक्स कंपनीच्या सीएसआर फंडातून पौष्टिक जीवनसत्व किटचे वाटप

**वडगाव आनंद : (समर्थ गांवकरी)**

फिनोलेक्स कंपनीचे सीएसआर पार्टनर मेसर्स मुकुल माझा फाउंडेशनच्या अध्यक्षा रितू छाब्रिया यांच्याकडून नेहमीच जिल्हा परिषद शाळेला काही ना काही दिले जात आहे त्यामध्ये कक्षा असेल संरक्षित धोरण असेल असे नवनवीन उपक्रम नेहमीच संस्था करत असते आणि आता तर विद्यार्थ्यांची काळजी घेत विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक आहार सुदृढ विद्यार्थी दादा भारतीय नागरिक घडविण्याचा त्यांचा मानस या ठिकाणी दिसून येत आहे.

भारताची भावी पिढी शाळेतील वर्गावर्गांतून घडत आहे. ही पिढी सुदृढ आणि निरोगी घडावी यासाठी या सेवाभावी कंपनीने शाळेचे शिक्षण तज्ञ सदस्य डीबी दाणा वाळुंज व शालेय अध्यक्ष दत्तात्रय चौगुले पाटील यांच्या समन्वयाने आपल्या जि प प्राथमिक शाळा वडगाव आनंद शाळेमध्ये



विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक आहार उपलब्ध करून देण्यात आला आहे. या सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी पार्थ कलाल यांनी विद्यार्थ्यांसाठी पौष्टिक आहाराचे (रागी सत्व) शंभर पाकीट उपलब्ध करून दिले असून याआधीही या संस्थेच्या माध्यमातून शाळेसाठी व्हरांडा सुशोभीकरण, विद्यार्थ्यांसाठी भोजन कक्ष, विद्यार्थ्यांना बैठक व्यवस्थेसाठी सतरंज्या अशा विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यापुढेही शाळेसाठी इंटरॲक्टिव्ह पॅनल तसेच शाळेच्या विद्युतीकरणासाठी सोलर सिस्टिम उपलब्ध करून देण्याचे त्यांनी यावेळी आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या शेवटी व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय चौगुले यांनी फाउंडेशनचे आभार मानले.

# रामतीर्थ पोलिसांची जुगार अड्डयावर धाड

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली तालुक्यातील रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोहगाव परिसरातील खैरगाव रस्त्यालगत सुरु असलेल्या जुगार अड्डयावर रामतीर्थ पोलिसांनी दि.९ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास धाड टाकून ३ जुगारासह २ लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, परंतु यातील अन्य सात जुगारी पळून जाण्यात यशस्वी झाले आहेत. बिलोली तालुक्यातील लोहगाव शिवारात खैरगाव रोडलगत काही व्यक्ती जुगार खेळत असल्याची माहिती रामतीर्थ पोलिसांना मिळाल्यावरून रामतीर्थ पोलिसांनी दि.९ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास त्या ठिकाणी सापळा रचून धाड टाकली असता त्यावेळी दहा जुगारी पैसे लावून जुगार खेळत असल्याचे आढळून आले. यादरम्या शिवाजी गोविंदराव चव्हाण रा. नायगाव, नागनाथ राम गायकवाड रा. नायगाव, महेश लक्ष्मण गंजलवाड रा. मनसक्करगा ता. देगलुर या तीन जुगाऱ्याना पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. आणि पळून जाणाऱ्यांची नावे विचारण्यात आली असता भगतसिंग उर्फ शेरसिंग रा. नायगांव, जाकीर शेख रा. खैरगांव, साईनाथ शिपाळे पाटील रा. नायगांव, किरण घंटेवाड रा. खैरगांव, अशोक पवार रा. नायगांव, गणेश कोतावार रा.होटाळा व व्यंकट शिंदे पाटील रा माजरंम असे असल्याचे सांगीतले. याठिकाणी रामतीर्थ पोलिसांनी २ लाख ६० हजाराचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस कर्मचारी अशोक विठठलराव यरपलवाड यांच्या फिर्यादीवरून रामतीर्थ पोलीस ठाण्यात दहा जुगाऱ्यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# महिलांनी आपले हक्क व कायदे जाणून घ्यावेत : न्यायाधीश अनुश्री फंड

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

स्त्री सशक्त झाली तर कुटुंब सशक्त झाले तर समाज सशक्त झाला तर राष्ट्र सशक्त होते असे प्रतिपादन जामखेड न्यायालयाच्या न्यायाधीश अनुश्री फंड यांनी केले. दि १० मार्च २०२६ रोजी शहरातील दि. पिपल्स एज्युकेशन सोसायटी चे ल. ना. होशिंग विद्यालयात तालुका विधी सेवा समिती जामखेड व वकील संघ जामखेड यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी पंचायत समिती सदस्या जयश्री देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून न्यायाधीश अनुश्री फंड या उपस्थित होत्या.यावेळी आर.एस. पी. कॅडेट मुलींनी सामना सॅल्यूट करून उपस्थित मान्यवरांना मानवंदना दिली. कार्यक्रमाची



सुरुवात राजमाता जिजाऊ माँ साहेब, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, त्यागमुर्ती माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींना गौरविण्यात आले. पुढे बोलताना न्यायाधीश अनुश्री फंड म्हणाल्या की, भारतीय संविधानाने महिलांसाठी विशेष तरतुदी केल्या असून त्यांच्या संरक्षणासाठी विविध कायदे करण्याचे अधिकार राज्यांना दिले आहेत. महिलांनी आपले अधिकार आणि कायदे जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. कायद्याची माहिती झाल्यास स्वतःचे हक्क आणि समोरच्या व्यक्तीची जबाबदारी याची जाणीव होते व आयुष्य अधिक सुरक्षित आणि सुखकारक जगता येते. आजची स्त्री ठरवले तर कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकते. राजमाता जिजाऊंनी शिवाजी महाराजांना घडवले, तर सावित्रीबाई फुलेंमुळे महिलांना शिक्षणाचा मार्ग खुला झाला. त्यामुळे संसार असो किंवा राजकारण, प्रत्येक क्षेत्रात महिला स्वतःची वेगळी ओळख निर्माण करू शकते.

अध्यक्षीय भाषणात जयश्री देशमुख म्हणाल्या, "पुढच्या जन्मातही मला स्त्रीच व्हायचे आहे. कारण स्त्रीकडे नवजीवन निर्माण करण्याची अद्भुत शक्ती आणि वेदना सहन करूनही जगाला जन्म देण्याचे सामर्थ्य आहे. स्त्री ही फक्त एक नाव नाही, ती एक ओळख आहे. ती जगाचा भार नाही, तर जगाची सुरुवात आहे. त्यामुळे स्त्री असणे हा प्रश्न नसून अभिमान आहे." यावेळी आरोग्य विभागाच्या सुप्रिया कांबळे, अंजली चिंतामणी,

मंगल तंठक, नगर परिषदेच्या नगरसेविका वैशाली म्हेत्रे, सिमा कुलकर्णी, नगरसेविका नंदा होळकर, संगीता भालेराव, प्रिती राळेभात, प्रा.हिना सय्यद, नंदा गोरे, राजश्री मोरे आदी महिला भगिनी तसेच प्राचार्य बाळासाहेब पारखे, उपप्राचार्य प्रा. युवराज भोसले, उपमुख्याध्यापक दत्तात्रय राजमाने, पर्यवेक्षक अनिल देडे, बबन राठोड, मुकुंद राऊत, पोपट जगदाळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख नरेंद्र डहाळे, पांडुरंग वराट, राजेंद्र कोहक, किशोर कुलकर्णी, कार्यालयीन अधिक्षक ईश्वर कोळी, उमाकांत कुलकर्णी, राघवेंद्र धनलगडे, विशाल पोले, रोहित घोडेस्वार, आदित्य देशमुख यांच्या सह वकील संघाचे अध्यक्ष ॲड. हर्षल डोके, ॲड.उपाध्यक्ष घनश्याम राळेभात, सचिव ॲड शिवाजी लटपटे, जेष्ठ विधीज्ञ ॲड. पोपट कात्रजकर, ॲड. महारुद्र नागरगोजे, कोर्ट कर्मचारी सागर ढगे, राजेश जाधव आदी शिक्षक, शिक्षकेतर-कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राध्यापिका खके जयश्री, डूचे वंदना, होमकर सुरेखा, पोकळे प्रमिला, भोईटे योगिता, पानसरे ऐश्वर्या, रणसिंग प्रिया, बाबर वैष्णवी, कात्रजकर अनुपमा तसेच माध्यमिक शिक्षिका संगीता दराडे, वंदना अल्हाट, पूजा भालेराव, स्वाती बांगर, स्वप्नाली घाडगे, रेश्मा कारंडे, प्रभा रासकर, स्वाती गिरी, प्रियांका सुपेकर, शितल जगदाळे, मोहिनी उगले आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वाती साबळे व सुत्रसंचालन अनिल देडे यांनी केले तर आभारप्रदर्शन सुप्रिया घायतडक यांनी मानले.

# राष्ट्रीय पातळीवर विद्यानिकेतनचा नावलौकिक



## प्रा, कुणाल काळे सर राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने सन्मानीत.

**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**

प्रा, कुणाल काळे सर यांनी विद्यानिकेतन नावाचं बीज जे ४ वर्षांपूर्वी संकल्पपूर्वक पेरले.पुढे तावून सुलाखून ते रोपटे झाले, आज तेच तग धरून वटवृक्ष प्रमाणे बहरते आहे. याची 'स्वीफ्ट अॅन्ड लीफ्ट' Swift & Lift संस्थेने दखल घेऊन राष्ट्रीय पातळीवरील पुरस्काराने सन्मानीत केले. येवले अमृततुल्य पुणे चे मॅनेजिंग डायरेक्टर नवनाथ येवले यांच्या हस्ते तसेच 2 वेळा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षण क्षेत्रातील मान्यवर यांच्या हस्ते विद्यानिकेतन प्रोफेशनल अॅकॅडमी आणि विद्यानिकेतन स्कूल ऑफ फाउंडेशन चे शैक्षणिक कार्य, झपाट्याने दर्जेदार शिक्षणाचा चढता आलेख,यशस्वीपणे राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम त्यांची अंमलबजावणी.

या सर्व गोष्टी इंदापूर च्या भौगोलिक मर्यादा ओलांडत लातूर पुणे पासून शिक्षणासाठी विद्यार्थ्यांचा ओघ सुरु आहे, ही अतिशयोक्ती नसून वास्तव आहे. एमबीबीएस, बीडीएस, आयआयटी, अॅग्रीकल्चर, वेटेरनरी सायन्स प्रत्येक क्षेत्रात विद्यानिकेतन प्रोफेशनल अॅकॅडमी चे नाव अग्रक्रमाने व आदराने घेतले जाते.

भविष्याचा वेध घेणारी शैक्षणिक संस्था म्हणून सध्या स्कूल ऑफ फाउंडेशन ची यशस्वी संकल्पना राबवून सध्या नावलौकिकात आहे.

सभोवताली असलेल्या जिल्ह्यातील शिक्षक,पालक,शिक्षण प्रेमी, पत्रकार आणि विद्यार्थी यांना आकर्षित करणारी संस्था म्हणून हा पुरस्कार अगदी रास्त आहे अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया येत आहेत.



ठाणे : दिवा शहरात पदपथ व रस्त्यावर अतिक्रमण केलेल्या हातगाडी व फेरीवाल्यांना हटविण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त शिवप्रसाद नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागात महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान दाखल करण्यात आले आहे. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...

### राज्यात पुढील ४ दिवस..... हवामान खात्याचा अलर्ट

मुंबई/अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यातील हवामानात सातत्याने मोठे बदल होत आहेत. फेब्रुवारी महिन्यात कधी पाऊस, उन्ह तर थंडी अशी स्थिती होती. मार्च महिन्याच्या सुरूवातीपासूनच हवामानात मोठे बदल होताना दिसले. तापमानात मोठी वाढ झाली असून अनेक जिल्ह्यांमध्ये पारा ४० च्या पार आहे. राज्यात उकाडा वाढलेला असतानाच भारतीय हवामान विभागाने अत्यंत मोठा अंदाज वर्तवला आहे. राज्यात पुढील ४ दिवस अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला. उष्णता वाढलेली असतानाच थेट पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यात पुढील काही तास अवकाळी पाऊस विजांच्या कडकाडाटासह कोसळेल. यासोबतच काही भागात उष्णतेचा अलर्टही देण्यात आला. कोकणात उष्ण आणि दमट हवामानाचा येलो अलर्ट भारतीय हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला. येणाऱ्या शनिवारी लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडाकडाटासह पावसाचा अंदाज आहे. यवतमाळ आणि चंद्रपूरमध्ये विजांच्या कडकाडाटासह वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. फक्त शनिवारीच नाही तर येणाऱ्या रविवारी देखील नागपूर, गडचिरोली, चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांतील काही भागात विजांचा कडकाडाटासह पाऊस होईल. यावेळी मोठ्या प्रमाणात वारेही सुटण्याचा अंदाज आहे. यासोबतच पुणे, नांदेड, बीड, परभणी येथील वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज आहे. दुसरीकडे मुंबईसह कोकणात उष्णता आणि दमट वातावरणात वाढ होण्याचा अंदाज आहे. राजस्थानच्या फतेहपूरमध्ये देशातील नीचांकी तापमानाची नोंद झाली. फेतेहपूरमध्ये १.४ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले. गुजरातच्या राजकोट येथे देशातील उच्चांकी तापमानाची नोंद झाली. ४१.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदवले गेले.



### आजची महिला मानसिक तणावाखाली जीवन जगत आहे - डॉ. वैशाली काकडे

अहिल्यानगर (स. गांवकरी) : आजची स्त्री प्रचंड मानसिक तणावाखाली असून तणावामुळे स्त्रीयांमध्ये विविध आजार उद्भवतात, महिलांना सर्व क्षेत्रात आरक्षण असले तरी मनमोकळेपणे त्यांना काम करता येत नाही कौटुंबिक जबाबदारी सांभाळून नोकरीच्या ठिकाणी काम करताना महिलांचा तणाव वाढताना दिसतो. असे प्रतिपादन डॉ. वैशाली काकडे यांनी केले. सावेडी उपनगरात तपोवन रोड येथील एकता महाविद्यालयात आयोजित जागतिक महिला दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला यावेळी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. निवृत्ती मिसाळ, उपप्राचार्य राजेंद्र मेहेत्रे, डॉ सलमान पठाण, दिपाली गिरी, मनोज क्षीरसागर आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. काकडे म्हणाल्या की, स्त्री जरी शिकली, नोकरी करत असली तरी तिला कौटुंबिक जबाबदारी, ऑफिसचे कामकाज यामुळे कामाचा व्याप वाढत असून महिलांमध्ये तणाव निर्माण होत आहे. महिलांनी मोबाईल मध्ये रिल्स पाहण्यात जास्त वेळ घालवल्यामुळे त्यांना तणावमुक्त होण्यासाठी वेळ मिळत नाही. तसेच महिलांमध्ये थायरॉईड आजार देखील मोठ्या प्रमाणात दिसून येत असून महिलांनी याकडे वेळीच लक्ष देऊन उपचार केले पाहिजे. असे आवाहन त्यांनी केले. उपप्राचार्य राजेंद्र मेहेत्रे यांनी आपल्या भाषणात सांगितले की महात्मा फुले व सावित्रीबाई यांच्यामुळे महिलांना शिक्षणाचे दारे खुली झाली आणि महिला आज विविध क्षेत्रात प्रगतीपथावर असून त्यांना सर्वत्र क्षेत्रात समान संधी उपलब्ध झाल्या आहेत. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. निवृत्ती मिसाळ यांनी महिलांचा सन्मान कशा प्रकारे वाढविता येईल याविषयी माहिती सांगितली.

## नातवंडासाठी साठवलेले ७० हजार रुपये व दागिने आगीत जळून खाक!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



अकोले तालुक्यातील कवटवाडी-आंबेदरा येथील धोंडू लक्ष्मण गंभीरे यांच्या शेतातील घराजवळ भर दुपारी लागलेल्या भीषण आगीत आजीबाईने नातवंडांसाठी साठवून ठेवलेली सुमारे ७० हजार रुपयांची रोख रक्कम व दागिने जळून खाक झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, गावासाठी गेलेल्या वीज वाहिनीच्या पोलवर अचानक शॉर्टसर्किट होऊन दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ठिणग्या व आगीचे गोळे खाली पडले. त्या ठिणग्यांमुळे खळ्यावर साठवून ठेवलेली भाताची साल, जनावरांसाठी ठेवलेला भाताचा पेंडा व इतर चाऱ्याला आग लागली. काही क्षणांतच या आगीने भीषण रूप धारण केले आणि वाऱ्याच्या झोक्याने आग गंभीरे कुटुंबाच्या घराकडे पसरली. घटनेच्या वेळी घरातील आजी ताईबाई लक्ष्मण गंभीरे या राजूर येथे गेल्या होत्या, तर त्यांचा मुलगा आळेफाटा येथे कामानिमित्त गेला होता. घरात सून सीताबाई धोंडू गंभीरे व मीराबाई धोंडू गंभीरे या होत्या. मीराबाई गंभीरे अंगणात काम करत असताना त्यांना जळण्याचा वास आला. त्यांनी मागे जाऊन पाहिले असता खळ्यावर मोठी आग लागल्याचे दिसून आले. त्या वेळी घरात एक वर्षाचा स्वामी व तीन वर्षांची त्रिशा ही लहान मुले झोळीत झोपलेली होती. तसेच घरात अर्धांगवायू झालेल्या दोन आजारी व्यक्ती बिछान्यावर होत्या. मीराबाई गंभीरे यांनी प्रसंगावधान राखत सर्वप्रथम दोन्ही लहान मुलांना बाहेर सुरक्षित ठिकाणी नेले. त्यानंतर घरातील अर्धांगवायू झालेल्या रुग्णांना धीर देत त्यांनाही बाहेर काढून जीव वाचवला. दरम्यान, आगीने एवढे भयानक रूप धारण केले होते की काही क्षणांतच घरातील साठवलेले धान्य, कपडे, भांडी, जनावरांचा चारा तसेच आजीबाईने नातवंडांसाठी साठवून ठेवलेली सुमारे ७० हजार रुपयांची रोख रक्कम व दागिने सर्वांच्या डोळ्यासमोर जळून खाक झाले. या घटनेमुळे गंभीरे कुटुंबाचा संसार अक्षरशः उद्ध्वस्त झाला आहे. या आगीत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. संबंधित प्रशासनाने पंचनामा करून गंभीरे कुटुंबाला तातडीची मदत द्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## राहुरी येथील रस्त्यावर पोलीसावर प्राणघातक हल्ला

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

कंटेनर चालकाला मारहाण करण्याच्या तयारीत असलेल्या टोळक्याला मज्जाव करणाऱ्या पोलिस हवालदारावर १५ जणांच्या टोळक्याने लोखंडी गज, लाकडी दांडक्यांनी प्राणघातक हल्ला करत त्यांच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना रविवारी (८ मार्च) रात्री ११.४५ च्या सुमारास राहुरी येथील ग्रीन हॉटेल चौक येथे घडली. या टोळक्याने मारहाण करताना पोलिसाचे कपडेही फाडले आहेत. या प्रकरणी बुरूडगाव (ता.नगर) येथील १५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पो.हे.कॉ. विकास रंगनाथ वैराळ असे या हल्ल्यात जखमी झालेल्या पोलिसाचे नाव आहे. रविवारी (८ मार्च) रात्री खंडू वसंत काळे, वैभव बाबासाहेब तारडे, संतोष अंकुश काळे, महेश निमसे (सर्व रा. बुरूडगाव, ता.नगर) व त्यांच्या समवेत इतर ११ अनोळखी इसम हे सर्वजण महिंद्रा कंपनीची स्कॉर्पिओ (क्र. एम एच १६ सीटी ७०) व आणखी एक विटकरी रंगाची स्विफ्ट कारमधील इसम हे राहुरी येथे नगर मनमाड रस्त्याने जात असताना त्यांच्या कारला कंटेनरचा (क्रं. एनएल ०१ एजे १३०८) धक्का लागला म्हणुन त्यावरील चालकाला लोखंडी गज व काठीने मारहाण करण्याच्या तयारीत असतांना व सदरची घटना फिर्यादीचे बीट हद्दीत घडत असल्याने फिर्यादीने त्यांची व्हिडीओ शुटींग केल्याचा मनात राग धरुन या आरोपींनी फिर्यादी वैराळ यांना लोखंडी फायटरने, लोखंडी गजाने, लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करुन फिर्यादीचा गळा दाबुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

## अतिक्रमण हटवण्याची ग्रामस्थांची मागणी!

**मंगरुळपीर : (समर्थ गांवकरी)**



वाशिम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यातील ग्रामपंचायत अरक येथील जिल्हा परिषद शाळेच्या जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून बेकायदेशीर अतिक्रमण झाल्याचा गंभीर प्रश्न समोर आला आहे. या अतिक्रमणामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर तसेच त्यांच्या सुरक्षिततेवर परिणाम होत असल्याची चिंता ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे. या संदर्भात विष्णु सुखदेव बुरे यांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती तसेच शासन प्रशासनाकडे वेळोवेळी लेखी निवेदने देऊन अतिक्रमण हटविण्याची मागणी केली आहे. मात्र इतका कालावधी उलटूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याची तक्रार करण्यात आली आहे. शाळेच्या परिसरात अतिक्रमण असल्यामुळे विद्यार्थ्यांना ये-जा करताना अडचणी निर्माण होत असून शैक्षणिक वातावरणावरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याच पार्श्वभूमीवर मंगरुळपीर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन देत तात्काळ अतिक्रमण हटविण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात आतापर्यंत प्रशासनाने कोणती कार्यवाही केली याची लेखी माहिती देण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, लवकरात लवकर योग्य ती कारवाई न झाल्यास वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित विभागाकडे तक्रार करून पुढील कायदेशीर पावले उचलण्याचा इशाराही देण्यात आला आहे. त्यामुळे आता या प्रकरणात प्रशासन नेमकी काय कारवाई करते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## शिवजयंतीनिमित्त कंचाड जि.प. शाळेत समाज कल्याण न्यासतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप!

**वाडा : (समर्थ गांवकरी)**



अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत व हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त कंचाड (ता. वाडा) येथील जिल्हा परिषद शाळेत समाज कल्याण न्यासच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम शुक्रवार, दि. ६ मार्च २०२६ रोजी उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात श्री. शिंदे गुरुजी यांच्या सुमधुर वाणीतील शिवव्याख्यानाने उपस्थितांना प्रेरणा दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळा कंचाड येथील विद्यार्थ्यांनी महाराजांच्या जीवनचरित्रावर आधारित भाषणे, व्याख्याने, पोवाडे सादर करत शिवविचार पेरण्याचे कार्य केले.

कार्यक्रमाचे आयोजन ज्येष्ठ शिवसैनिक शाखाप्रमुख सतीश चौधरी व पालघर जिल्हा समाज कल्याण न्यास अध्यक्षा सौ. अंजलीताई चौधरी यांच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांना समाज कल्याण न्यासच्या वतीने वह्या, पेन व इतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

समाज कल्याण न्यासचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सोन्या काशीनाथ पाटील यांचे गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक क्षेत्रात सुरू असलेल्या कार्याची माहितीही कार्यक्रमात उपस्थितांना देण्यात आली.

या प्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे ज्येष्ठ पदाधिकारी दौलत पाटील, अशोकभाई ठाकरे, शाम ठाकरे, रमेश ठाकरे, कीनी दादा, संदीप चौधरी (भाजपा जिल्हा उपाध्यक्ष), पुष्कराज चौधरी, अशोक शर्मा, सागर मानेवडे, नितीन चौधरी, राष्ट्रवादीचे बाळा चौधरी, सतीश पाटील, शिवसेना शिंदे गटाचे तालुका संघटक संदीप भोईर, विक्रमगड विधानसभा समन्वयक वैभव पाटील, माजी सभापती योगेश गवा, माजी सभापती संतोष बुकले, वाडा नगरपंचायत उपनगराध्यक्ष संदीप गणोरे, शहरप्रमुख राजू पाटील, महिला शहरप्रमुख सौ. भावे, नगरसेवक अजिंक्य पाटील व उमेश लोखंडे यांसह शिक्षक, ग्रामस्थ, महिला मंडळ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तेजस धोबी यांनी केले, तर आभार प्रदर्शन समाज कल्याण न्यासच्या पालघर जिल्हाध्यक्षा सौ. अंजलीताई चौधरी यांनी केले. उपस्थितांनी या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

## विद्यार्थ्यांच्या शरीर, मन, बुद्धीच्या विकासासाठी योग आवश्यक

### स्वामी परमार्थदेव : हर्षवर्धन पाटील यांचा योग शिबिरात सहभाग : बावडा शिक्षण संकुल मध्ये योग शिबिर

**इंदापूर : (समर्थ गांवकरी)**



योग म्हणजे केवळ व्यायाम नसून जगण्याची शिस्तबद्ध कला आहे. निरोगी शरीरातच निरोगी मन व निरोगी भविष्य दडलेले असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शरीर, मन आणि बुद्धीच्या विकासासाठी योग आवश्यक असल्याचे प्रतिपादन पतंजली योगपीठ हरिद्वारचे मुख्य केन्द्रीय प्रभारी प. पू. स्वामी परमार्थदेवजी महाराज यांनी मंगळवारी (दि. 10) केले.

बावडा येथील श्री शिवाजी एज्युकेशन संस्थेच्या शैक्षणिक संकुलच्या श्री शिवाजी विद्यालयाच्या आवारामध्ये पतंजली योगपीठ हरिद्वार संचलित पतंजली योग समिती भारत स्वाभिमान ट्रस्ट इंदापूर यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आयोजित एक दिवसीय योग शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना स्वामी परमार्थदेवजी महाराज बोलत होते.

या योग शिबिराचे उद्‌घाटन राष्ट्रीय सहकारी साखर महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, प.पु.स्वामी परमार्थदेवजी मुख्य केंद्रीय प्रभारी पतंजली योगपीठ हरिद्वार यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी प. पू. स्वामी परमार्थदेवजी यांनी विद्यार्थ्यांना जीवनामध्ये राग न येऊन देणे व संयम पाळणे हे यशस्वी जीवनासाठी आवश्यक असल्याचे व त्यासाठी योग व प्राणायाम आवश्यक असल्याचे नुमूद केले. निरोगी जीवन जगण्याची योग, प्राणायाम ही एक जीवन पद्धती असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच याप्रसंगी त्यांनी आरोग्यासाठी लाभदायक अशा प्रकारचे योग प्राणायामाची प्रात्यक्षिके केली तसेच काही योगासनांची प्रात्यक्षिके करून दाखवली. यावेळी हर्षवर्धन पाटील यांनीही स्वामी परमार्थदेवजी यांच्याबरोबर योगासनाचा लाभ घेतला.

या योग शिबिरास उदयसिंह पाटील, मनोज पाटील, किरण पाटील, डॉ.लक्ष्मण आसबे, स्वप्निल घोगरे, पवनराजे घोगरे, संतोष सूर्यवंशी, अमोल घोगरे, रणजीत गिरमे, रणजीत घोगरे, आचार्य प्रितीश लाड राज्य, आचार्य अविनाश, चंद्रशेखर खापणे, योगरत्न दत्तात्रय अनपट पतंजली योग समिती इंदापूर, प्राचार्य दशरथ घोगरे, ग्रामस्थ, अध्यापक, अध्यापिका, विद्यार्थी उपस्थित होते. आभार उदयसिंह पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन शब्बीर मुलाणी व अमर निलाखे यांनी केले.

## जाहीर नोटीस

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३४/२०२६ अकोले दि. ११/०३/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. बिलाल लालसहाब तांबोळी, रा.अकोले**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **यांचा स्वत: बिलाल लालसहाब तांबोळी यांचा जन्म दि. ०२/१०/१९७१ रोजी अकोले** येथे झाला असल्याची नोंद **मुख्याधिकारी नगरपंचायत अकोले** यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. बिलाल लालसहाब तांबोळी, रा.अकोले**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **यांचा स्वत: बिलाल लालसहाब तांबोळी यांचा जन्म दि. ०२/१०/१९७१ रोजी अकोले** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद **मुख्याधिकारी नगरपंचायत अकोले**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ११/०३/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

...दराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले,
... This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
...दक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, अॅड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
...विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# नगरपरिषदेकडुन शहराला दुषीत पाणीपुरवठा

## राष्ट्रवादी काँग्रेस आक्रमक

## स्वच्छ पाणी द्या, अन्यथा आंदोलन छेडणार - शहाजी (काका) राळेभात



**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील तपनेश्वर भागात दुषित पाणी येत असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नगरसेवक व पदाधिकाऱ्यांनी शहराला पाणीपुरवठा होत असलेल्या पाण्याच्या टाकीवर जाऊन प्रत्यक्ष पहाणी केली. यावेळी पाण्याच्या टाकीत शेवाळ व दुषित पाणी पुरवठा होत असल्याचे दिसून आले. जर नगरपरिषदेने शहराला स्वच्छ पाणी पुरवठा केला नाही तर पुढील काळात जामखेड तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवा नेते शहाजी राळेभात यांनी दिला आहे. बुधवार दिनांक 11 मार्च रोजी तपनेश्वर भागात नळाचे पाणी सुटले होते. मात्र नळाद्वारे पिवळसर व दूषित पाणीपुरवठा होत असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले. ही बाब नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या नगरसेवकांच्या निदर्शनास आणून दिली. यानंतर पदाधिकारी व नगरसेवक पाणीपुरवठा होत असलेल्या भुतवडा रोड येथील पाण्याच्या टाकीवर गेले त्यांनाही तेथुन होणारा पाणीपुरवठा दुषीत होत असल्याचे दिसून आले.

पुढे बोलताना शहाजी राळेभात म्हणाले की आम्ही प्रत्यक्ष पाणीपुरवठा होत असलेल्या पाण्याच्या टाकीची व इतर ठिकाणी पहाणी केली. यावेळी पाण्याच्या टाकीची अस्वच्छता दिसुन आली. पाण्यात शेवाळ आढळुन आले आहे. त्यामुळे हे दुषीत पाणी नागरीकांच्या आरोग्याला धोकादायक ठरणार आहे. मुख्याधिकारी यांनी या गोष्टीकडे गांभिर्याने पाहीले पाहीजे. तसेच जर नागरिकांना स्वच्छ पाणी मिळाले नाही तर लवकरच तहसील कार्यालय व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

जेष्ठ नेते राजेंद्र कोठारी म्हणाले की पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी रजिस्टर रेकॉर्ड दिसुन आले नाही. मुख्याधिकारी यांनी या गोष्टीकडे गांभिर्याने पाहीले पाहीजे, नागरीकांना स्वच्छ पाणी देता येत नसेल तर मुख्याधिकारी यांनी आपली बदली करून घ्यावी असे देखील कोठारी म्हणाले. लवकरच आम्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आंदोलन छेडणार आहोत असे सांगितले. जामखेड शहरातील नव्वद टक्के लोक हे पाणी पितात. या दुषीत पाण्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच पाणीपुरवठा स्वच्छ व सुरळीत करण्यात यावा अशी मागणी केली. आता नागरीकांना स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी स्वच्छ पाणी पुरवठा होण्यासाठी आंदोलनाचा इशारा नगरपरिषदेला दिला आहे. त्यामुळेच आता नगरपरिषद काय भुमिका घेते यावर पुढील कार्यवाही आवलंबुन आहे.

यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे ज्येष्ठ नेते राजेंद्र कोठारी, युवा नेते शहाजी (काका) राळेभात, संभाजी राळेभात, नगरसेवक राजेंद्र गोरे, प्रशांत राळेभात माजिद कुरेशी, वसीम सय्यद, इस्माईलभाई सय्यद, संदिप गायकवाड, डॉ. कैलास हजारे, सागर सदाफुले, प्रवीण उगले, हरिभाऊ आजबे, सागर भोसले, सचिन शिंदे, दिपक घायतडक, दत्ता डिसले, स्वामी दिक्षित, नगरपरिषदेचे पाणीपुरवठा आभियंता ज्ञानेश्वर मिसाळ उपस्थित होते.

नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकडे ग्रामपंचायत काळातील अपुरा कर्मचारी वर्ग आहे. तरी देखील आम्ही नागरिकांना स्वच्छ पाणी देण्याचा प्रयत्न करित आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांच्या सुचनांचे पालन करु तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून जामखेड शहराला पाणीपुरवठा देण्यात येईल.

**(ज्ञानेश्वर मिसाळ, अभियंता पाणीपुरवठा विभाग, जामखेड नगरपरिषद)**

# नगरसेवकाची पाणीटंचाई विरोधात आंघोळ

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



गेल्या काही दिवसांपासून ठाणे शहरात पाण्याची मोठी समस्या निर्माण झाली आहे. पाणी वितरण करणारी यंत्रणा सदोष असल्याने पाण्याचा पुरवठाच होत नाही. त्यामुळे आपल्या घरातही पाणी आले नाही, असा आरोप करीत राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे नगरसेवक अभिजीत पवार यांनी थेट ठामपा मुख्यालयाच्या आवारातच आंघोळ केली. ठाणे महानगर पालिका हद्दीत पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. ठाणे शहराला 621 दशलक्ष लिटर्स पाण्याची गरज आहे. मात्र, प्रत्यक्षात 550 दशलक्ष लीटरच्या आसपास पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे मोठ्याप्रमाणात पाणी टंचाई भेडसावत आहे. गेल्या काही दिवसांपासून दर आठवड्यात निर्जळी घेण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसांपासून कळव्यात प्रचंड पाणी टंचाई भेडसावत आहे. बुधवारी अनेक सोसायट्यांमध्ये पाणीच आलेले नसल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. या संतप्त नागरिकांच्या भावनांना अभिजीत पवार यांनी अनोखे आंदोलन करून वाट मोकळी करून दिली. अभिजीत पवार हे साधारण दीड वाजेच्या सुमारास पालिका मुख्यालयात आले. पालिका मुख्यालयाच्या आवारात असलेल्या नळावर बादली पाण्याने भरून पोर्चमध्येच आंघोळ केली.

# किरकोळ वादाचे रूपांतर थेट खुनात

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**



नायगाव तालुक्यातील डोक्यात गंभीर मार लागल्याने २९ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याने गावात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी नायगाव पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ००५८/२०२६ नोंद करण्यात आला असून दोघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस अटक ही करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली मिळालेल्या माहितीनुसार, टेंभुर्णी येथील युवक गणेश किशनराव वडजे (वय २९) हा शेती व्यवसाय करत होता. ९ मार्च रोजी गावात देवस्थानाची यात्रा असल्याने रात्री गावात मोठी गर्दी होती. गणेश व त्याचे कुटुंबीय जेवण करून यात्रेकडे गेले असताना गावातील पप्पू उर्फ जैनराज सटवा सुताडे (वय ३१, व्यवसाय ऑटोचालक) याच्याशी काही कारणावरून वाद झाला. हा वाद वाढत गेल्याने दोघांमध्ये जोरदार भांडण झाले. या भांडणादरम्यान आरोपीने गणेश वडजे यांच्या डोक्यावर दगडाने जोरदार मारहाण केली. यात ते गंभीर जखमी झाले. रात्रीच्या अंधारात ते जखमी अवस्थेत रस्त्याच्या कडेला पडले होते. सकाळी गावकऱ्यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर घरच्यांना कळवले. कुटुंबीय घटनास्थळी पोहोचले असता गणेश वडजे हे मृत अवस्थेत आढळून आले. या प्रकरणी मृताच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून पप्पू उर्फ जैनराज सटवा सुताडे व शाम सटवा सुताडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम १०३(१) व ३(५) अंतर्गत खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात्रेच्या रात्रीच घडली रक्तरंजित घटना टेंभुर्णी गावात खुनाची परंपरा अनेक दिवसापासून आहे.येथे अनेक वेळा खून झाले आहेत.पण हा खून म्हणजे किरकोळ वादातून झालेला आहे.येथील देवस्थानाची यात्रा सुरू असताना रात्री उशिरा हा प्रकार घडला. यात्रेच्या ठिकाणी झालेल्या किरकोळ वादातूनच हा खून झाल्याची माहिती समोर आली असून गावातील आनंदाचे वातावरण एका क्षणात शोकाकुल झाले. भांडणादरम्यान गणेश वडजे यांच्या डोक्यावर जोरदार मार लागल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

# सरकारने श्वेत पत्रिका काढावी

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

डॉ. मनमोहन सिंह यांच्या काळात (२००४-२०१४, UPA सरकार) बंद पाईपलाइन (closed/underground pipeline) द्वारे क्रूड तेल किंवा मुख्यतः नैसर्गिक वायू (natural gas) वितरण करण्याच्या अनेक योजना आणि प्रकल्पांवर चर्चा, चर्चासत्र आणि काही प्रमाणात अंमलबजावणी झाली असल्याचा दावा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरीष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केला.. ते पुढे म्हणाले की, बंद पाईप लाईन द्वारे प्रकल्पांपैकी, सर्वात प्रमुख आणि तत्कालीन चर्चेत असलेला प्रकल्प होता Iran-Pakistan-India (IPI) Gas Pipeline (ज्याला "Peace Pipeline" म्हणूनही ओळखले जात होते हा प्रकल्प इराणमधून नैसर्गिक वायू पाईपलाइनद्वारे पाकिस्तानमार्गे भारतात आणण्याचा होता.

# तवली-ठाकरवस्ती ते दरेकर वस्ती रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



पारनेर तालुक्यातील म्हसोबा झाप-कन्हेर येथे आमदार काशिनाथ दाते सरांच्या स्थानिक विकास निधीतून मंजूर झालेल्या तवली- ठाकरवस्ती ते दरेकर वस्ती रस्त्याच्या खडीकरण व मजबुतीकरण कामाचे भूमिपूजन डॉ. प्रदीप दाते यांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. या रस्त्यासाठी १० लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मंजुरी मिळाल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. सदर रस्ता पूर्ण झाल्यानंतर स्थानिक नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीस मोठी सोय होणार असून शेतकरी, विद्यार्थी तसेच कामानिमित्त ये-जा करणाऱ्या ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. विशेषतः पावसाळ्यात होणाऱ्या अडचणी कमी होऊन गावकुसातील वस्तीपर्यंत सहज वाहतूक होणार असल्याने ग्रामस्थांनी या विकासकामाचे स्वागत करत आमदार दाते सरांचे आभार मानले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रदीप दाते म्हणाले की, शेतकरी, कष्टकरी व सर्वसामान्य जनतेप्रती आमदार काशिनाथ दाते सरांना असलेली आत्मीयता आणि जिव्हाळा हा मतदारसंघाच्या विकासाचा खरा पाया आहे. जोपर्यंत सर मतदारसंघाचे नेतृत्व करत आहेत, तोपर्यंत सामान्य माणसाला न्याय मिळत राहील याबाबत मला अजिबात शंका नाही.

ते पुढे म्हणाले की, आज संपूर्ण मतदारसंघात सुरू असलेल्या सर्वसमावेशक विकासकामांचा वेग हा सरांच्या जनसामान्यांप्रती असलेल्या आपुलकीचे प्रतिक आहे. सामान्यातल्या सामान्य व्यक्तीलाही आमदार दाते सरांशी बोलण्यासाठी कोणत्याही मध्यस्थीची गरज भासत नाही, हीच त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे.

सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांना न्याय मिळावा यासाठी आमदार दाते दर सोमवारी पारनेर येथे आणि शुक्रवारी नगर येथील संपर्क कार्यालयात दिवसभर नागरिकांच्या भेटीसाठी उपलब्ध राहतात, असेही त्यांनी सांगितले. मतदारसंघाच्या कानाकोपऱ्यातून आशा घेऊन आलेला प्रत्येक नागरिक समाधानी होऊन परत जावा, हा त्यांचा कायमचा अट्टाहास असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या प्रसंगी रंगनाथ दाते, महादू शेठ आहेर, पोपट आहेर, सुखदेव आहेर, मारुती दरेकर, राजेंद्र भालके, संतोष जाधव, बबन दरेकर, सुभाष आहेर, चंदुशेठ दरेकर, प्रकाश रोहकले, अमोल दरेकर, दादू दरेकर, हरीभाऊ दाते, सुनील पवार, महेंद्र पवार, आदिनाथ रोहकले, महेंद्र रोहकले आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुन्नरच्या श्रद्धेय गाडेकर ने बनवले भारतातील पहिले ऑफलाईन नेवीगेशन ट्रेकिंग ॲप

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील श्रद्धेय सुनील गाडेकर (वय २२) याने आपल्या दोन इंजिनिअर प्रमोद पुडाळे आणि सागर यादव मित्रांच्या मदतीने दुर्ग हे भारतातील पहिले भारतीय ऑफलाईन नेवीगेशन ट्रेकिंग ॲप जे गड किल्ले चढण्यासाठी मार्ग अणि वाटा दाखवते हे ॲप तयार केले आहे.

सध्या सह्याद्रीत ट्रेकिंग करताना अपघातांची संख्या वाढत आहे, विशेषतः हरवणे आणि वाट चुकण्याचे प्रसंग वारंवार घडत आहेत. अशा परिस्थितीत दुर्ग ॲप ट्रेकर्ससाठी एक महत्त्वाचा पर्याय ठरत आहे. भारतातील पहिल्या आणि एकमेव ऑफलाइन ट्रेकिंग नॅव्हिगेशन ॲपमधून १६० हून अधिक गड-किल्ल्यांचे, धबधब्यांचे आणि गुहांचे नकाशे उपलब्ध आहेत.

इंटरनेटशिवायही हे ॲप अचूक मार्गदर्शन करते. त्यामुळे हरवण्याचा धोका कमी होतो. ट्रेकिंगला सुरक्षित आणि सुकर बनवण्यासाठी दुर्ग ॲप सध्या काळाची गरज बनले आहे. श्रद्धेय गाडेकर हा सध्या एमबीए करत असून लहानपणापासून त्याला गड किल्ले सर करण्याची व ट्रेकिंग करण्याची आवड आहे.

ट्रेकिंग करताना त्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत होते. त्यामुळे त्याने ट्रेकर्सला मदत होणारे ॲप हे करण्याचे ठरवले. इयत्ता बारावी पासून तो हे ॲप बनवण्याचे प्रयत्न करत होता. त्याने प्रमोद पुड़ाले, सागर यादव या आपल्या दोन इंजिनियरिंग करत असणाऱ्या मित्रांची यासाठी मोठी मदत झाली.

या तिघांनी तीन वर्षांच्या अथक प्रयत्नांनी हे यश मिळवले. श्रद्धेय गाडेकर च्या या यशाचे जुन्नर तालुक्यात सर्वत्र कौतुक होत आहे.

या दुर्ग ॲप वैशिष्ट्ये:

१. २००+ ट्रेक रूट्स:महाराष्ट्रातील २०० पेक्षा जास्त किल्ले, धबधबे आणि गुहांचे नेव्हिगेशन. २. ऑफलाइन नेव्हिगेशन: ट्रेक सुरू करण्याआधी नेव्हिगेशन मॅप डाउनलोड करून तुम्ही इंटरनेटशिवाय ट्रेक करू शकता. ३. सोपे व नेमके मार्गदर्शन:ॲपच्या नेव्हिगेशन फीचर्समुळे तुम्हाला सुरुवातीच्या ठिकाणापासून ट्रेकच्या टोकापर्यंत सहज पोहोचता येते.

४. विश्वासार्ह आणि अचूक:ट्रेकिंगसाठी खास तयार करण्यात आलेले नेव्हिगेशन तुम्हाला चुकीच्या वाटेवर जाण्यापासून वाचवते.

५. उत्तम रेटिंग आणि लोकप्रियता: Google Play Store वर ४ स्टार रेटिंगसह ॲपचे ४५०००+ डाउनलोड्स आहेत.

किल्ले प्रेमी आणि ट्रेकर्ससाठी उपयोग:

* ट्रेकिंगच्या प्रत्येक टप्प्यावर मार्गदर्शन.
* सह्याद्रीच्या दुर्गम भागांमध्ये सुद्धा नेव्हिगेशन मदत उपलब्ध. • ट्रेकिंगच्या उत्साहींसाठी एकमेव संपूर्ण ट्रेकिंग सोल्यूशन.

DURG ॲपला महाराष्ट्राच्या दुर्गांची ओळख आणि ट्रेकिंगला प्रोत्साहन देण्यासाठी विकसित करण्यात आले असल्याने सर्व ट्रेकर्सला याचा फायदा होत आहे.

# कोयत्याने हल्ला

**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर आदिवासी शासकीय वस्तीगृह बारव येथील आवारातुन बुधवार दि. ११ . स. ९ वा . अ ब क . रा. आंबे ही मुलगी कॉलेजला जाण्यासाठी बाहेर पडली असता सरकारी दवाखान्याच्या पाठीमागे पत्रा शेड जवळ महेश मुरलीधर डामसे रा. आंबे याने धारदार कोयत्याने मानावर व तोंडावर वार केले.याबाबत सविस्तर माहिती जुन्नर पोलीस स्टेशन ने अशी माहिती दिली की , महेश मुरलीधर डामसे म्हणाला की , मला लग्नास नकार देतेस का ? असे म्हण अचानक डोक्यावर, चेह-यावर डावे बाजुला खुन करण्याचे उद्देशाने लोखंडी कोयत्याने वार करुन मला गंभीर दुखापत केली. अ ब क या विद्यार्थिनीने बचावासाठी डावा हात आडवा लावल्यावर डावे हाताला गंभीर दुखापत झाली आहे. सदरची घटना गंभीर जखमी अवस्थेत जमीनीवर पडल्यावर महेश डामसे हा तेथुन पळून गेला..


# बरबडा हाद्दीतील अवैध वाळू चोरी करणाऱ्याना महसुल प्रशासन व पोलीस प्रशासनाचा आशिर्वाद का?

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील बरबडा व सर्कल अंतर्गत असलेल्या गावांतील मागील काही दिवसांपासून रात्रीच्या वेळी व बरबडा हदितील दिवसा वाळू , चोरी करणाऱ्याना वाळू माफियांना रान मोकळी केलीय काय बरबडा व टाकळी येथील तलाठी संबंधित विभाग यांचा आशिर्वाद आहे अशी चर्चा दपक्या आवाजात सुरू आहे . उमरी , मुदखेड , लोहा , तालुक्यातील व येथील वाळु माफीयांनी बरबडा हाद चोरी व तस्करी वाढली आहे. या माफियांना ना कोणाचा धाक राहिला , ना कुणाची भिंती महसूल विभागाच्या वाळू माफिया रात्रीच्या दिवसाढवळ्या बरबडा वाडी , मनुर ,भागातून अवैध चालू आहे वेळी वाळूची चोरी करून खुलेआम वाहतूक करत आहेत. बरबडा हादितील येथील व येळी , मारतळा , खुजडा , मनुर , येथील लोहा तालुक्यातील वाळू रात्रीला व मोठ्या प्रमाणात नायगाव तालुक्यातील बरबडा व बरबडा वाडी भागातून सर्कल अंतर्गत असलेल्या गावात नायगाव तसिलचा अनागोंदी कारभारामुळे वाळू व अवैध वाहतूक होत आहे. ती वाळू टिप्परमधून वाहतूक करुन विक्री केली जात आहे. गोदावरी पात्रातून दिवसाढवळ्या वाळू काढल्या जात आहे. चोरीने काढलेली वाळू नायगावच्या तहसीलदार यांनी चोरट्या मार्गाने वाळूचे उत्खनन करून अवैध वाहतूक करणाऱ्यांना रान मोकळे सोडले आहे. काय ? आशी चर्चा बरबडा व परिसरात सुरू आहे या सर्व बाबींकडे.पोलीस अधिक्षक अबीनाश कुमार व तहसीलदारांनी अनन्य रेड्डी मॅडम याकडे लक्ष देऊन तत्काळ बंदोबस्त करण्याची मागणी बरबडा व परिसरात गावकऱ्यांनी केली आहे.

# श्रीगोंद्यात १५ मार्च रोजी विराट हिंदू संमेलन



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा शहरात येत्या १५ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता संत श्री शेख महमंद महाराज मंदिर प्रांगणात विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती हिंदू संमेलन आयोजन समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली. या संमेलनात श्री क्षेत्र सरला बेटचे महंत हभप रामगिरीजी महाराज मार्गदर्शन करणार आहेत. हिंदू समाजातील आपापसातील जातीभेद विसरून हिंदू परंपरा, संस्कृती व मूल्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशभक्त व आदर्श नागरिक घडवून भारतमातेला वैभवाच्या शिखरावर विराजमान करण्याचा संदेश या संमेलनातून दिला जाणार आहे. संमेलनामध्ये सामाजिक समरसता, नागरिकांचे कर्तव्य तसेच पर्यावरण संवर्धन या विषयांवरही मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी ४ वाजता भव्य शोभायात्रेने होणार असून ही शोभायात्रा कालकाई चौक येथील कलिका माता मंदिरातून निघून संत श्री शेख महमंद महाराज मंदिर प्रांगणात येणार आहे.

# विध्यार्थ्यांनी घेतला शाळेत डांगर भोपळ्याच्या घाऱ्यांचा (पुरी) आस्वाद

**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**



नेहमीच आगळे वेगळे उपक्रम करणारी पुणे जिल्ह्यातील आदर्श प्राथमिक शाळा वडगाव आनंद (ता. जुन्नर) या शाळेतील परसबागातील सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या भोपळ्यांच्या घारग्यांच्या मिष्टान्न भोजनाचे आयोजन शिक्षक व शालेय व्यवस्थापन समितीने केले होते, याचे औचित्य साधून पुणे जिल्हा परिषद कार्यालयाकडून शाळेचे शिक्षण तज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते डी . बी.नाना वाळुंज यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर करून उभारण्यात आलेल्या नूतन वर्ग खोलीचे उद्घाटन तसेच आजच्या स्पर्धेच्या युगातील शाळेतील विद्यार्थ्यांना संगणकीय ज्ञान परिपूर्ण मिळावे, यासाठी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रय चौगुले, शिक्षण प्रेमी डी.बी. नाना वाळुंज व सर्व शिक्षकांनी एकमताने शाळेत २६ संगणक सुविधा उपलब्ध केली असून एवढेच नव्हे तर वाढत्या उष्णतेचा विचार करून संगणक कक्षाला वातानुकूलित कक्ष केला असून याची चर्चा संपूर्ण जिल्ह्यात आहे. या कार्यक्रमासाठी शालेय व्यवस्थापन समितीने नवनिर्वाचित जि.प .सदस्य मंगेश काकडे व पंचायत समिती सदस्या सपना शिंदे. तसेच ग्रामपंचायत लोकनियुक्त सरपंच रेलिका जाधव व त्यांचे सर्व सहकारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. शाळेतील सर्व सोयीसुविधांचा लेखाजोखा सर्व मान्यवरांनी घेतल्यामुळे जि. प.सदस्य मंगेश काकडे यांनी इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांना आपली शाळा सहज स्पर्धा करू शकते, नव्हे तर येथील शिक्षक भारताची नवीन पिढी घडवण्यात अग्रेसर आहेत, असे प्रतिपादन केले. पंचायत समिती सदस्या सपना शिंदे यांनी शाळेच्या पुढील वाटचालीसाठी आवश्यक ती मदत करण्याचे आश्वासन या कार्यक्रमाच्या वेळी दिले. मिष्टान्न भोजन विद्यार्थ्यांना व पाहुण्यांना बनवण्यासाठी मोठ्या संख्येने माता पालक उपस्थित राहून चवदार असे मिष्टान्न भोजन तयार करून शाळेचा इतिहासात माता पालकांनी आपले नाव नोंदवून नोंदविले. पंचायत समिती सदस्या सपना शिंदे व त्यांचे पती जीवन शिंदे या उभयतांनी मुलांच्या पंक्तीत पाहुणचार करत रुचकर भोपळ्याच्या पुऱ्या, कांदा भजी, मसालेभात. यांचा मनमुराद आस्वाद घेतला. तसेच तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी अशोक लांडे यांनी देखील कार्यक्रमाचे कौतुक करत मुख्याध्यापक, शिक्षक व शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य त्याचप्रमाणे माता पालक या सर्वांची आभार मानले

या कार्यक्रमासाठी जि.प सदस्य मंगेश काकडे, पंचायत समिती सदस्या सपना शिंदे, माजी पंचायत समिती सदस्य जीवन शिंदे, लोकनियुक्त सरपंच रेलिका जाधव, माजी विस्तार अधिकारी राधा चौगुले, सामाजिक कार्यकर्ते रामदास सोनवणे, अरुण जाधव, ग्रामपंचायत पंचायत सदस्य संतोष पादिर, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ वाळुंज, सचिन देवकर, शिवाजी डोके. माजी सभापती संगीता वाघ उद्योगपती सचिन गडगे, पत्रकार गोपी शिंदे आदी ग्रामस्थ व माता पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाची यशस्वितेसाठी सर्व माता पालक व शाळेतील शिक्षिका छाया डुंबरे, सुनंदा तांबे, सविता खेत्री. गीतांजली बोऱ्हाडे-वाळुंज तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष दत्तात्रय चौगुले व शिक्षण तज्ञ सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते डीबी यांना वाळुंज यांनी विशेष परिश्रम घेतले.

# म. फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक भव्य दिव्य व्हावे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



माळीवाडा येथील नियोजित महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक व्हावे.ही सर्व समाजाची इच्छा आहे.या बैठकीला जिल्ह्यातील सर्व समाजाचे नेते उपस्थित आहेत.प्रशासनाने स्मारकाचे काम तातडीने सुरू करावे.स्मारकाचे काम भव्य दिव्य होण्यासाठी वेळ प्रसंगी माळीवाडा वेस पाडावी.असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

अहिल्यानगरच्या वैभवात भर टाकणाऱ्या क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे ऊर्जास्थान आपल्या शहरात उभे राहणार आहे. माळीवाडा (अहिल्यानगर) येथे या दोन्ही महापुरुषांचा भव्य पूर्णाकृती पुतळा आणि स्मारक उभारण्याच्या कामाला गती मिळावी आणि हे काम लवकरात लवकर सुरू व्हावे. यासाठी बंधन लॉन्स येथे फुले दांपत्य स्मारक समितीच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या मागणीचे निवेदन महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.

याप्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव,माजी उपमहापौर अनिल बोरुडे, सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले कृती समितीचे अध्यक्ष प्रा. माणिक विधाते,नगरसेवक सुरेश बनसोडे,भगवान फुलसौंदर,दत्ता गाडळकर, संजय लोंढे, सुनील त्र्यंबके,नगरसेविका गीतांजली काळे,शितल ढोणे, वर्षा सानप,सुजाता पडोळे,रूपाली दातरंगे,मंगल भुजबळ,शेंडी चे सरपंच प्रयागाताई लोंढे,रेणुका पुंड,मनोज ताठे,पद्मशाली समाजाचे नेते गणेश विद्ये,श्रीनिवास बौज्जा,महेंद्र बिज्जा,एडवोकेट राजेंद्र गाली,स्वकुळ साळी समाजाचे कृष्णा बागडे,कैकाडी समाजाचे अध्यक्ष विशाल माने,पारनेरचे ओबीसी नेते खंडु भुकन, राष्ट्रवादी ओबीसी चे अध्यक्ष दिपक खेडकर, अमित खामकर,बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड,माळी महासंघाचे मनोज फुलसौंदर, गणेश धाडगे, मनोज भुजबळ, सोनार समाजाचे सोमनाथ चिंतामणी,अशोक फलके देवांग कोष्टी समाज, नाभिक समाजाचे अनिल निकम, सत्यशोधक समाजाचे ज्ञानदेव खराडे,म.फुले समता परिषदेचे अध्यक्ष ब्रीजेश ताठे, कैलास गाडिलकर,

भरत गारुडकर,प्रसाद कोके,अजय ढोणे,राजेंद्र ताठे,राजेंद्र पडोळे,पंडित खरपुडे,सुरेश तात्या आंबेकर, अशोकराव आगरकर, अँड.अशोक गायकवाड, प्रा.सुनिल जाधव, सुनील राऊत,पोपट शिंदे, यशवंत गारदे,साहेबराव विधाते, रमेश चिपाडे,संजय ताजणे, रामदास फुले, प्रकाश इवळे, अरुण गाडळकर, राजेंद्र झोडगे, अनिल धाडगे, बजरंग भुतारे, सुरेश कावळे, सुधीर पुंड, राजाराम चिपाडे,ज्ञानेश्वर रासकर,विनोद पुंड,अनिल इवळे, बजरंग भुतारे,अशोक आगरकर आदी उपस्थित होते.

सुरेश बनसोडे म्हणाले, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक व्हावे. हे सर्व अहिल्या नगरकरांचे स्वप्न आहे.स्मारक होण्यासाठी काही अडचणी आहेत वेळप्रसंगी आंदोलन करू व त्या मार्गी लावू.वेशीच्या आडून जे काही लोक राजकारण करीत आहेत त्यांना समाजकंटक व देशद्रोही म्हणून घोषित करावे.

यावेळी यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, प्रयागाताई लोंढे, गीतांजली काळे,सुजाता पडोळे, प्राध्यापक माणिक विधाते, पंडित खरपुडे ,अमोल भांबरकर,बजरंग भुतारे, गणेश विद्ये, कृष्णा बागडे, ज्ञानदेव खराडे, पंडित खरपुडे, रोहन सानप,खंडु भुकन, ज्ञानेश्वर रासकर आदींनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन बाळासाहेब भुजबळ यांनी केले तर आभार राजेंद्र पडोळे यांनी मानले. या बैठकीला फुले दांपत्य स्मारक समिती व जिल्ह्यातील फुले प्रेमी व विविध समाजाचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मधुसूदन मुळे यांची राष्ट्रीय सचिव पदी नियुक्ती

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर शहरातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मधुसूदन मुळे यांची अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या (ABBM) राष्ट्रीय समितीमध्ये सचिव पदावर नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.नियुक्ती तीन वर्षांसाठी म्हणजेच ३१ मार्च २०२९ पर्यंत करण्यात आली आहे. प्राध्यापक मधुसूदन मुळे यांनी आजपर्यंत अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ महाराष्ट्र प्रदेश सेक्रेटरी म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. ब्राह्मण विचार मंचचे ते संस्थापक अध्यक्ष, याज्ञवल्क्य पतसंस्थेचे विद्यमान संचालक,हिंद सेवा मंडळ या शैक्षणिक संस्थेचे माजी अध्यक्ष व विद्यमान जेष्ठ कार्यकर्ते,शब्दगंध साहित्यिक परिषदेचे जेष्ठ कार्यकर्ते,सुयोग ट्रस्ट रेणुका माता मंदिर ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष आणि विद्यमान सेक्रेटरी अशी अनेक पदे भूषवली आहेत. साहित्यिक म्हणून आणि प्रखर वक्ता या नात्याने दूरवर ते परिचित आहेत. या निवडीबद्दल श्री मुळे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. मधुसूदन मुळे यांनी नेहमीच अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या संविधानाचे, उपविधींचे आणि धोरणांचे पालन करण्यास सहमत आहात.आम्हाला आशा आहे की तुम्ही तुमच्या भूमिका आणि जबाबदाऱ्यांवर लक्ष केंद्रित कराल आणि तुमच्या प्रयत्नांद्वारे सामाजिक राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनुभवाच्या जोरावर एका नवीन उंचीवर घेऊन जाल.आणि सर्वसाधारणपणे ब्राह्मणांच्या आणि विशेषतः एबीबीएमच्या सर्वांगीण विकासात योगदान देण्यासाठी तुमचे समर्पण, पाठिंबा आणि कठोर परिश्रम घेतील अशी अपेक्षा आहे.अशी भावना अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे अध्यक्ष डॉ.गोविंद कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

# मौजे आंदेगाव पूर्व येथील अवैध दारू विक्री विरोधात ग्रामस्थ आक्रमक

■ दारू विक्री करणाऱ्याच्या घरात जाऊन बोटलांची केली तोडफोड

**हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)**



तालुक्यातील मोजे आंदेगाव पूर्व येथे अवैध देशी दारू विक्रीमुळे गावातील तरुणाई व्यसनाधीन होत असल्याने संतापलेल्या ग्रामस्थांनी आणि नव तरुण युवकांसह महिलांनी आक्रमक आज पवित्रा घेत, अवैध दारू अड्डे उद्ध्वस्त केले आहेत तालुक्यातील बऱ्याच ठिकाणी व अनेक ग्रामीण भागात ग्रामसभेत ठोस ठराव मंजूर करून देखील तालुक्यातील अवैध दारू विक्री बंद करण्याचे आवाहन प्रशासनाला करण्यात आले असून तरी पण ही अवैध दारू बंद होत नसल्यामुळे आज चक्क आंदेगाव येथे दहा मार्च रोजी संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी अवैध देशी दारू विक्री करणाऱ्याच्या घरावर धाड टाकून त्यांच्या घरातील दारूच्या बाटल्यांचा खच बाहेर काढून तो फोडत संबंधित दारू विक्री करणाऱ्यांची नावे चावडीवर सांगून ग्रामसभेमध्ये त्यांनी पोलीस प्रशासनाला बोलावत त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करण्याची विनंती केली या घटनेवरून असे निदर्शनास येते की जे काम पोलीस प्रशासनाला जमले नाही ते काम गावातील ग्रामरक्षक दलाने करून कारवाईची मोहीम हाती घेतली आहे या घटनेमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठात नेट-सेट-गेट मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्घाटन

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये पीएम-उषा यांच्या आर्थिक सहाय्याने आयोजित आठ दिवसीय नेट,सेट आणि गेट मार्गदर्शन कार्यशाळेचे उद्घाटन दि.११ मार्च रोजी विद्यापीठातील अधीसभा सभागृहामध्ये करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख उपस्थितीमध्ये अधिसभा सदस्य युवराज पाटील हे होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सांगितले की, केवळ नेट-सेट-गेट परीक्षा उत्तीर्ण होणे हेच अंतिम ध्येय नसून विद्यार्थ्यांनी ज्ञानाचा व्यापक दृष्टिकोन ठेवून अभ्यास करणे आवश्यक आहे.

# स्नेहसंमेलनातून व्यक्तिमत्त्वाची नवी ओळख निर्माण होते – नरेंद्र चव्हाण

**मुदखेड : (समर्थ गांवकरी)**





महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी जडणघडण होत असते. अभ्यासाबरोबरच शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास होणे आवश्यक आहे. महाविद्यालयातील वार्षिक स्नेहसंमेलनामुळे विद्यार्थ्यांना विविध कलागुण सादर करण्याची संधी मिळते. तसेच यश-अपयश स्वीकारण्याची क्षमता निर्माण होते आणि प्रत्येकाला स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाची नवी ओळख मिळते, असे प्रतिपादन नरेंद्र चव्हाण यांनी केले. राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथे आयोजित 'वार्षिक स्नेहसंमेलन 2026' च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे होते. उद्घाटक म्हणून नरेंद्र चव्हाण (श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेडचे कार्यकारिणी सदस्य तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य) उपस्थित होते. यावेळी मुदखेड येथील सामाजिक कार्यकर्ते माधव कदम, दत्तूभाऊ देशमुख आणि थोर साहित्यिक कवी मनोज बोरगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात श्रद्धेय डॉ. शंकरराव चव्हाण व कुसुमताई चव्हाण यांच्या प्रतिमापूजनाने करण्यात आली. यानंतर साहित्यिक कवी मनोज बोरगावकर यांनी विद्यार्थ्यांशी हितगुज साधत आपल्या कविता सादर केल्या. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे म्हणाले की, महाविद्यालय नेहमी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत असते. विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवे पैलू मिळतात आणि त्यातून देशासाठी सक्षम नागरिक घडतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

मान्यवरांच्या शुभहस्ते काही विशेष अवार्ड प्रदान करण्यात आले. यावेळी अवार्ड प्राप्त विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यात डॉ.शंकरराव चव्हाण बेस्ट लायब्ररी यूजर अवार्ड कुमारी कादंबरी चंद्रकांत चौदंते, डॉ शंकरराव चव्हाण बेस्ट स्पोर्ट्स मॅन अवार्ड रौनकसिंग बलवंतसिंग गाडीवाले, सौ. कुसुमताई चव्हाण एन.एस.एस.व्हॅलेंटियर्स अवार्ड युवराज संजय राठोड, सौ कुसुमताई चव्हाण बेस्ट कल्चरल आर्टिस्ट अवार्ड कुमारी अंजली संतोष सोनटक्के, तसेच कुमारी गायत्री कालिदास पांचाळ यांना नांदेड आकाशवाणी केंद्रावर भाषण, वर्तमानपत्रांमध्ये लेखन, तसेच विद्यापीठ स्तरावरील विविध स्पर्धांमध्ये विशेष कामगिरी केल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची रूपरेषा व प्रास्ताविक डॉ. दत्ताजी मेहेत्रे यांनी मांडली. सूत्रसंचालन डॉ. राजू कोंडेकर यांनी केले तर आभार डॉ. विजयसिंह ठाकूर यांनी मानले.

# "शेतकरी, ग्रामीण विकास आणि जनतेच्या प्रश्नांसाठी ठाम आवाज"

*अर्थसंकल्पीय चर्चेत आमदार काशिनाथ दाते सरांची अभ्यासू भुमिका*

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**




> उद्योग व रोजगाराच्या संधी उद्योग क्षेत्रात महाराष्ट्राने घेतलेली आघाडी कौतुकास्पद असुन सुपा एमआयडीसीमध्ये सुरू झालेल्या उद्योगांमुळे रोजगाराच्या संधी वाढत आहे. उद्योग विकासामुळे ग्रामीण भागातील युवकांना स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध होईल, तसेच दुष्काळी भागासाठी सिंचनाची गरज पारनेर मतदारसंघ हा प्रामुख्याने दुष्काळी भाग असल्याचे सांगत त्यांनी कुकडी व गोदावरी खोऱ्यातील पाणी लिफ्टद्वारे पठार भागात आणण्याच्या योजनांना गती देण्याची गरज, या योजनांचे सर्वेक्षण सुरू झाल्याने त्या लवकर पूर्ण व्हाव्यात अशी अपेक्षा.
>
> **- आ. काशिनाथ दाते सर, (विधानसभा सदस्य)**

महाराष्ट्र विधानसभेत सन २०२६–२७ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेदरम्यान पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी अत्यंत अभ्यासपूर्ण आणि लोकाभिमुख भूमिका मांडत शेतकरी, ग्रामीण भाग आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले. सभागृहात बोलताना त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत केले. तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतींचा उल्लेख करत या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली असल्याचे नमूद केले. अर्थसंकल्पातील दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय स्वागतार्ह असुन नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांनाही अधिक प्रोत्साहनपर अनुदान दिले पाहिजे. सध्या कांदा व टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना अत्यंत कमी बाजारभाव मिळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडत असल्याचे आ. दाते यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. तंत्रज्ञानासोबतच शेतमालाला रास्त भाव मिळण्यासाठी ठोस धोरण आवश्यक असायला हवे.

ग्रामीण विकासालाही समान प्राधान्य हवे शहरी भागात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा उभारल्या जात असताना ग्रामीण भागातील रस्ते, दळणवळण आणि मूलभूत सुविधांनाही तितकेच महत्त्व देणे गरजेचे असल्याने मुख्यमंत्री शेत पाणंद रस्ते योजना व रोजगार हमी योजनेतील पाणंद रस्त्यांची कामे एकत्रितपणे प्रभावीपणे राबविण्याचीही सूचना आ. दातेंनी केली. सौर कृषी पंप व वीजपुरवठ्याचा प्रश्न

मतदारसंघात सौर कृषी पंपासाठी अर्ज करूनही अनेक शेतकरी दीर्घकाळ प्रतीक्षा करत असल्याने सौर ऊर्जा प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण करून शेतकऱ्यांना तातडीने सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी सरकारकडे केली. तसेच ग्रामीण भागातील अपुरा वीजपुरवठाही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला. पशुधन आजाराबाबत तातडीची उपाययोजना कराव्या,

# स्त्रीचे आरोग्य हाच तिच्या आत्मविश्वासाचा पाया

**नांदेड जिल्हा: (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्र आणि रसायनशास्त्र संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून प्रसिद्ध व्याख्यात्या डॉ. उज्वला सदावर्ते उपस्थित होत्या. कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. उज्वला सदावर्ते यांनी महिलांच्या शारीरिक व मानसिक आरोग्याच्या महत्त्वावर विशेष भर दिला. त्या म्हणाल्या की, स्त्रीचे शारीरिक आरोग्य हा तिच्या आत्मविश्वासाचा पाया असतो. पौगंडावस्था ते रजोनिवृत्तीपर्यंत शरीरात होणारे बदल समजून घेत महिलांनी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

# विद्यार्थ्याची नामांकित कंपनीत उच्च पॅकेजवर निवड

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**



श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड येथील बी.टेक. इलेक्ट्रॉनिक्स व टेलेकम्युनिकेशन शाखेच्या अंतिम वर्षात शिक्षण घेणारा विद्यार्थी अनुज अग्रवाल याची Eternal Limited या नामांकित कंपनीमध्ये Software Development Engineer पदासाठी निवड झाली आहे. कंपनीकडून देण्यात आलेल्या ऑफरनुसार अनुज अग्रवाल याला वार्षिक रु. ५६ लाख रुपयाच्या पॅकेज वर नियुक्ती करण्यात आलेली आहे. या उल्लेखनीय यशामुळे संस्थेचा शैक्षणिक व तांत्रिक दर्जा पुन्हा अधोरेखित झाला असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या वर्षात विविध विभागांशी समन्वय ठेवून प्लेसमेंट विभागानी घेतलेल्या अधिकच्या परीश्रमातून रु.५५ लाख पेक्षा वरच्या पॅकेज वर विद्यार्थ्याची नियुक्ती होण्याची ही दुसरी वेळ आहे. ही संस्थेसाठी अभिमानाची बाब आहे. या यशाबद्दल संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करताना सांगितले की, "संस्थेत विद्यार्थ्यांना केवळ अभियांत्रिकी पदवी देण्यावर भर नसून त्यांना आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन आणि नवोपक्रम यांच्या माध्यमातून उद्योगविश्वासाठी सक्षम बनविण्यावर विशेष लक्ष दिले जाते. त्यामुळेच संस्थेतील विद्यार्थ्यांना देशातील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांमध्ये संधी मिळत आहे. अनुज अग्रवालचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल." अनुज अग्रवालच्या या उल्लेखनीय यशामुळे संस्थेतील विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून भविष्यातही संस्थेतील विद्यार्थी विविध क्षेत्रात अशीच उल्लेखनीय कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. अनुज अग्रवाल याच्या या यशा बद्दल एस. जी. जी. एस. अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, विष्णुपुरी, नांदेड चे नियमक मंडळाचे अध्यक्ष सुनील जी रायठठ्ठा, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई चे संचालक तथा नियामक मंडळाचे मा. सदस्य डॉ.विनोद मोहीतकर, प्रा. डॉ विक्रम गद्रे, सौ.राजश्रीताई पाटील, निखिलजी मुंडले, प्रशांत पौळ, आशुतोष डुमरे, बाबा सुखविंदर सिंघजी, डॉ. डी. डी. डोये, व डॉ. जे. व्हि. मेघा, तसेच संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. संदीप मुंढे, इलेक्ट्रॉनिक्स व टेलेकम्युनिकेशन या विभागाचे विभाग प्रमुख प्रो. सुनील जत्ती, सर्व अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांकडून मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे.

# सायकल वितरण व रस्ता काँक्रीटीकरण कामाचे लोकार्पण



> ग्रामस्थांच्या मागणीनुसार यापूर्वीही विविध विकासकामे मार्गी लावून गावाच्या विकासाला गती दिल्याबद्दल आणि आता पुन्हा पळशी–वनकुटे रस्त्यावरील पुलासाठी सुमारे ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून गावाच्या महत्त्वाच्या प्रश्नाला न्याय दिला आहे. या निर्णयामुळे परिसरातील नागरिकांची मोठी सोय होणार आहे. याबद्दल संपूर्ण ग्रामस्थांच्या वतीने मी आमदार काशिनाथ दाते सरांचे मनःपूर्वक आभार मानतो.
>
> **- गणेश शिंदे, सामाजिक कार्यकर्ते**
>
> मलवीर विद्यालयातील ४० विद्यार्थ्यांना शासकीय योजनेतून सायकल उपलब्ध करून दिल्यामुळे त्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला मोठी मदत होणार आहे. तसेच शाळेकडे येणाऱ्या सुमारे १० लाख रुपयांच्या काँक्रीट रस्त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थांची ये-जा अधिक सुलभ झाली आहे. या विकासकामांसाठी पुढाकार घेतल्याबद्दल आमदार काशिनाथ दाते सरांचे विद्यालयाच्या वतीने मनःपूर्वक आभार.
>
> **- रामदास शिंदे, मुख्याध्यापक मलवीर विद्यालय पळशी**

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पळशी ता. पारनेर येथे आज विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महत्त्वपूर्ण असा कार्यक्रम आमदार काशिनाथ दाते सरांचे चिरंजीव डॉ. प्रदीप दाते यांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. यावेळी मलवीर विद्यालयातील ४० विद्यार्थ्यांना शासकीय योजनेतून सायकल वितरण करण्यात आले तसेच विद्यालयाकडे जाणाऱ्या सुमारे १० लाख रुपयांच्या निधीतून करण्यात आलेल्या रस्ता काँक्रीटीकरण कामाचे लोकार्पण करण्यात आले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या प्रवासाला नवी गती मिळणार असून शाळेत ये-जा करताना विद्यार्थ्यांना होणाऱ्या अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत. नव्याने करण्यात आलेल्या रस्त्यामुळे विशेषतः पावसाळ्यातील वाहतुकीची समस्या दूर होऊन विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळणार आहे. यावेळी बोलताना डॉ. प्रदीप दाते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, सर्व विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून शिक्षकांचे मार्गदर्शन घ्यावे, मोठी स्वप्ने पाहावीत आणि प्रामाणिक परिश्रमातून आपल्या कुटुंबाचे व समाजाचे नाव उज्ज्वल करावे, मलवीर विद्यालयात आज ४० विद्यार्थ्यांना सायकल वाटप होत असल्याने अत्यंत आनंद होत आहे. ग्रामीण भागात अनेक विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी अंतराची अडचण भेडसावत असते. शासनाच्या या योजनेमुळे विद्यार्थ्यांना शाळेत येणे-जाणे सोपे होईल आणि शिक्षणासाठी अधिक वेळ देता येईल. ही सायकल केवळ प्रवासाचे साधन नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांच्या दिशेने वाटचाल करणारा एक विश्वासाचा साथीदार आहे.

ते पुढे म्हणाले की, विद्यालयाकडे जाणाऱ्या रस्त्याचे सुमारे १० लाख रुपयांच्या निधीतून काँक्रीटीकरण करण्यात आल्यामुळे विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांना मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. शिक्षणाची वाट अधिक सुकर व्हावी हा या विकासकामामागील मुख्य उद्देश आहे. पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर नेहमीच शिक्षण, विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील विकासाला प्राधान्य देत आले आहेत. विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी मुख्याध्यापक आर. टी. शिंदे सर, गणेश शिंदे, सुभाष गांधी, राहुल सुडके, कैलास चिकणे, नंदू शिंदे, आकाश कोकाटे, किसन काळे, कृष्णा सुडके, विकास रोकडे, सम्राट साळवे, संपत जाधव, आनंद गांधी, पोपट मोढवे, शिवा पारधी, रावसाहेब साळवे, नितीन पाटोळे, गीताराम साळवे, सिताराम साळवे यांसह मलवीर विद्यालयाचे सर्व शिक्षक, पालक व स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांचे असहकार आंदोलन स्थगित



**अहिल्यानगरः (समर्थ गांवकरी)**

भूमि अभिलेख विभागातील कर्मचा-यांच्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांसंदर्भात भूमि अभिलेख कर्मचारी कृति समिती महाराष्ट्र राज्य व पालक संघटनांच्या वतीने गेल्या दि.१८ फेब्रुवारी २०२६ पासून टप्प्याटप्प्याने असहकार आंदोलन पुकारण्यात आले होते.

त्याअनुषंगाने गेल्या दि.६ मार्च रोजी मा. मंत्री, महसूल यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे कर्मचा-यांचे प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस मा. मंत्री महसूल, मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल व वनविभाग, मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे, मा. अध्यक्ष भूमि अभिलेख राजपत्रित अधिकारी संघटना व इतर अधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत मंत्री महोदयांनी भूमि अभिलेख विभागातील भूकरमापक संवर्गास S८ व परिरक्षण भूमापक संवर्गास ९१२ ही वेतनश्रेणी देणेबाबत निश्चित करण्यात येऊन आगामी मंत्रिमंडळ बैठकीत हा विषय मांडून अंतिम करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. तसेच शिरस्तेदार संवर्गास देखील ९१४ ही वेतनश्रेणी देणेबाबत आश्वासित केले आहे. कर्मचा-यांना त्यांचे वेतनातच निश्चित प्रवासभत्ता समाविष्ट करुन देणेबाबत प्रस्ताव वित्त विभागकडे मंजूरीस पाठविला असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विभागाचा आकृतीबंध मंजुर झाला असून शासन निर्णय निर्गमित करणेबाबत कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले.

त्यामुळे संप मागे घेणेबाबत मा. मंत्री महोदयांनी सुचित केले असून मा.अपर मुख्य सचिव, महसुल व वनविभाग, मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांनी देखिल शासन याबाबत सकारात्मक असल्याचे सांगून संप मागे घेण्याबाबत विनंती केली आहे. मा. मंत्री महोदयांच्या सन्मानजनक विनंतीनुसार तसेच छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियान सुरळीत पार पाडण्याकरीता तसेच महाराष्ट्रातील शेतक-यांच्या हितार्थ कर्मचा-यांच्या न्याय मागण्यांना मंत्री महोदयांनी दिलेल्या शब्दाचा मान राखून सदरचे बेमुदत कामबंद आंदोलन हे तात्पुरते स्थगित करण्यात येत आहे. तरी सर्व कर्मचा-यांना नम्र विनंती आहे की आपले शासकीय कामावर रुजू व्हावे.

चर्चेचे मुद्दे मंजूर मागण्या :- ७वा वेतन आयोग (बक्षी समिती) ने तसेच येतन निवारण त्रुटी समिती (खुल्लर समिती) ने नाकारलेल्या वेतनश्रेणी बाबत फक्त भूमि अभिलेख विभागाच्या मागणीसाठी शासनाच्या उच्चाधिकार समितीची (High Power Committe) मिटींग पार पडली असून विभागाला तांत्रिक वेतनश्रेणी लागू करणे व सुधारीत आकृतीबंध (याढीय पदांसह) याबाबत मान्यता देण्यात आली आहे. ,मा.महसूल मंत्री महोदयांनी पुढाकार घेऊन S८ आणि ९१२ चेतन श्रेणी (विनाअट) देण्याबाबत मान्य केलेले आहे. तसेच आकृतीबंध निश्चित झाला आहे. त्याबाबत शासन निर्णय निर्गमित करणे बाकी आहे. येणा-या मंत्रिमंडळ बैठकीत वेतनश्रेणी बाबत प्रस्ताव मांडणार असल्याचे मा. मंत्री महोदयांनी सांगितले., सदर प्रस्तावास महसूल विभागासह, वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग, विधी व न्याय विभाग यांची मान्यतेने प्रस्तावित करणेत येईल असे मा. मंत्री महोदय यांनी सांगितले., परिरक्षण भूमापक यांची ११७६ पदे वाढणार असल्याने २०१२ नंतर विभागात आलेले तांत्रिक कर्मचारी यांची परिरक्षण भूमापक या पदावर पदोन्नती होणार आहे. , जर ७व्या वेतन आयोगात आपल्या वेतनातील त्रुटी दुरुस्त झाल्या तर ८ व्या वेतन आयोगात आपला निश्चित जास्त फायदा होईल. आणि हे काम शासनच करणार आहे. या क्षणी त्यांना संधी देणे कर्मचारी हिताचे आहे., शिरस्तेदार संवर्गाचे S १४ ही वेतनश्रेणी लागू करणेबाबत देखील शासन सकारात्मक आहे.,प्रवासभत्ता किमान र.रु. २०००/- ते ४०००/- वेतनात समाविष्ट करुन देणेबाबत प्रस्ताव वित्त विभागाकडे मंजुरीस सादर करुन तो देखिल मंजूर करण्यात आलेला आहे.

याप्रमाणे महाराष्ट्र राज्य भूमि अभिलेख कृति समिती संघटना यांनी पुकारलेला संप मागण्या मंजूर करुन मागे घेण्यात आलेला आहे. सदर संप यशस्वी होणेसाठी नाशिक विभागाचे अध्यक्ष रवि डिक्रुज, अहिल्यानगर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राहुल मापारी, संघटक उमेश कोदे, मिलींद भिंगारदिवे, शशिकांत धस, गणेश गरड, श्रीराम बोरुडे, भारकर हराळ, राजेंद्र नरवडे, प्रविण गायकवाड, जगदीश जावळे, संग्राम लवांडे, सर्वेश्वर वैकर, कानिफनाथ निमसे, प्रविण अवचरे, प्रदिप अवचर, वनिता खुर्द, धनेश्वरी गरदास, रुपाली गवळी, स्मिता केदारी, सविता बिडकर, संगिता कापडणी, गिता मेरगू, यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

## सांस्कृतिक कार्यक्रमांनी रंगली शिवजयंती उत्सव!



**मुरबाडः (समर्थ गांवकरी)**

राजे छत्रपती युवा प्रतिष्ठान, मुरबाड यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती तिथीनुसार मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि सन्मान सोहळ्यांमुळे संपूर्ण कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी शिवगर्जना देत महाराजांना अभिवादन केले. देवपे गावातील महिला व मुलींनी रांगोळी स्पर्धेत सहभाग घेत आकर्षक रांगोळ्या साकारल्या. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक पवन शिंदे यांच्या सुरेल गायनाने स्वरसंध्येला विशेष रंगत आली. त्यानंतर गायक परेश लाटे यांनीही आपल्या आवाजाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. संध्याकाळी पाच वाजता महिलांसाठी हळदीकुंकू समारंभ आयोजित करण्यात आला. त्यानंतर शिवकन्या, शिवव्याख्याती व प्रसिद्ध सूत्रसंचालिका करुणा गगे यांनी 'जागर स्त्रीशक्तीचा' आणि 'होम मिनिस्टर' या लकी ड्रॉसह विविध खेळांचे आयोजन करून महिलांमध्ये उत्साह निर्माण केला. रात्री नऊ वाजता गायक वैभव मंडलिक, मृदंगमणी सुधीर करावे तसेच संगीतकार दर्शन वाघचौडे यांच्या सुरेल मैफली आणि पोवाड्यांनी उपस्थितांची मने जिंकली. या कार्यक्रमाला ठाकरे सेनेचे उपजिल्हाप्रमुख मधुकर (आप्पा) धुळे, भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष जयवंत सूर्यराव, शिवसेना ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख संतोष विशे, शहरप्रमुख मंगेश भुशारी, कृष्णकांत मलिक तसेच पोलीस पाटील संतोष चौधरी यांची उपस्थिती होती.

या शिवजयंती सोहळ्याचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते नरेश म्हाडसे आणि युवा उद्योजक सचिन गायकर यांनी केले होते. कार्यक्रमादरम्यान नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या उपस्थितीत गावातील ज्येष्ठ नागरिक, मुरबाड तालुक्यातील पोलीस पाटील तसेच विविध क्षेत्रातील कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

## अर्जाची १८ मार्चपर्यंत मुदतवाढ

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील कलम १२ (सी) (१) नुसार दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित व विना अनुदानित शाळांमध्ये २५ टक्के राखीव जागांवर प्रवेश देण्याची प्रक्रिया सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. आरटीई २५ टक्के प्रवेशासाठी बालकांच्या पालकांकडून ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया दि. १७ फेब्रुवारी, २०२६ ते दि. १० मार्च, २०२६ या कालावधीत सुरू होती. पालकांना अर्ज भरण्यासाठी शासनाच्या https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

## तालुक्यातील दरोडेखोरांच्या टोळीतील ४ आरोपी जेरबंद

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



श्री सोमनाथ घार्गे साहेब, पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर जिल्ह्यातील दरोडा, घरफोडी व रोड रॉबरी गुन्हयाचे अनुषंगाने वेळोवेळी पेट्रोलिंग करुन, गुन्हे रोखण्याबाबत आदेश दिलेले आहेत. सदर आदेशानुसार श्री किरणकुमार कबाडी, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोउपनि/ महादेव गुट्टे, पोलीस अंमलदार गणेश लोंढे, लक्ष्मण खोकले, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, मनोज साखरे, प्रशांत राठोड, सुनिल मालणकर यांचे पथक तयार करुन दरोडा, घरफोडी व रोड रॉबरी गुन्हयाचे अनुषंगाने पेट्रोलिंग करुन, गुन्हे रोखण्याबाबत सुचना व मार्गदर्शन करुन रवाना केले होते. वरील पथकाने गेल्या दि. १० मार्च रोजी अहिल्यानगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत दरोडा प्रतिबंधक पेट्रोलींग करीत असतांना पथकास गुप्त माहितीद्वारा मार्फत ६ ते ७ इसम दोन मोटार सायकलवर येवुन मदडगाव गावचे शिवारातील टाकळी काझी ते अंमळनेर जाणारे रोडवर थांबुन सशस्त्र दोरडा घालण्याचे तयारीत असल्याची माहिती मिळाली. पथकाने तात्काळ माहितीतील नमुद ठिकाणी मदडगाव गावचे शिवारातील टाकळी काझी ते अंमळनेर जाणारे रोडवर पाण्याचे टाकीजवळ अंधारात काही इसम संशयीतरित्या हातामध्ये हत्यारे घेवुन उभे असल्याचे दिसुन आले. तेव्हा पथकाने सदर ठिकाणी छापा टाकुन चार इसमांना ताब्यात घेतले व इतर इसम पळुन गेले.

ताब्यात घेतलेल्या इसमांना त्यांचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नावे १) छगन चिंतामण काळे (वय-४३ वर्षे तळेवस्ती कडा, ता.आष्टी, जि.बीड), २) महावीर पंढरीनाथ भोसले (वय- ३९ वर्षे रा. शेरी खु ता. आष्टी जि. बीड) , ३) कदम चिंचवन काळे (वय- ३५ वर्षे रा. तळेवस्ती कडा, ता. आष्टी, जि.बीड), ४) इदगर गारमन चव्हाण (वय- ३८ वर्षे रा. शेरी खु ता. आष्टी जि. बीड) ,असे असल्याचे सांगितले. ताब्यातील इसमांना पळुन गेलेल्या इसमाचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांवे ५) प्रविण हबाजी भोसले (फरार) ६) प्रफुल्ल हबाजी भोसले (दोघे रा. पिंपरखेड ता. आष्टी जि.बीड), (फरार) ७) संतोष उर्फ सिंधुशा सुर्यभान काळे (रा. गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीगनर) (फरार) असे असल्याचे सांगितले. त्यांनी काहीएक माहिती सांगितली नाही.

नमुद इसमांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता, त्यांचे कब्जात मुद्देमाल मिळुन आला आहे.

## स्मार्टमीटर संबंधाने नागरिकांच्या तक्रारीवर तातडीने कारवाई करा

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

शहरात महावितरणमार्फत बसविण्यात येत असलेल्या नवीन स्मार्ट वीज मीटरबाबत नागरिकांच्या तक्रारींत मोठी वाढ झाली असून, या समस्यांचे तातडीने निराकरण करण्यात यावे, अशी मागणी किनवट नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. सुजाता एंड्रलवार यांनी विद्युत कार्यालयाच्या उपविभागीय अभियंत्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.




नगराध्यक्षा सुजाता एंड्रलवार यांचे महावितरण कार्यालयाला पत्र

शहरात सध्या जुने वीज मीटर बदलून नवीन डिजिटल मीटर लावण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, हे नवीन मीटर लावल्यापासून अनेक वीज ग्राहकांना अव्वाच्या सव्वा बिले येत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षांनी नागरिकांच्या हितासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. नवीन मीटर बसवल्यानंतर अचानक वीज बिलात दुपटीने वाढ झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

नवीन मीटर अत्यंत वेगाने फिरत असल्यामुळे सामान्य कुटुंबांचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. स्मार्ट मीटरची कार्यपद्धती बिलिंग पद्धत व तांत्रिक माहितीबाबत कोणती स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही

शहरातील जनतेच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. महावितरणने नवीन मीटरची पारदर्शकता तपासावी आणि ज्या ग्राहकांना वाढीव बिले आली आहेत, त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी विशेष शिबिर आयोजित करावे अशा मागण्या सौ. सुजाता एंड्रलवार यांनी निवेदनात केल्या आहेत.जर महावितरणने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. नवीन मीटरची तपासणी करून व ती अचूक असल्याची खात्री करूनच बसवण्यात यावीत, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

या निवेदनामुळे आता महावितरण प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण किनवटवासीयांचे लक्ष लागले आहे. याप्रसंगी शिवसेना उबाठा पक्षाचे शहर प्रमुख प्रशांत कोरडे नगर परिषदेचे बांधकाम सभापती श्रीराम नेम्मानीवार, अन्वर मिर्झा, निसार भाटी राजू सातूरवार हे उपस्थित होते.


## महिला दिन उत्साहात साजरा

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदे तालुक्यातील अरणगाव दुमाला येथे आज जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत व गावातील महिला बचत गटांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मोहनराव आढाव हे होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते महिला सशक्तीकरणाचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना सरपंच मोहनराव आढाव यांनी महिलांनी शिक्षण, उद्योग व सामाजिक क्षेत्रात पुढे येऊन आत्मनिर्भर बनावे, असे आवाहन केले. समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून महिलांच्या सक्षमीकरणासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले.

## धामणी-पहाडदरा शेतकऱ्यांच्या संघर्षाला मोठे यश

*मुख्यमंत्र्यांकडून १५ दिवसांत कार्यवाहीचे आश्वासन!*



**मंचर : (समर्थ गांवकरी)**

### अधिवेशनात घुमला शेतकऱ्यांचा आवाज

आज सुरू असलेल्या अधिवेशनात ना. दिलीपराव वळसे पाटील यांनी धामणी येथील शेतकऱ्यांचा प्रश्न आक्रमकपणे मांडला. यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक निर्णय जाहीर केला. "येत्या १५ दिवसांच्या आत संबंधित ठिकाणची पाहणी करून योग्य ती दखल घेतली जाईल आणि शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल," असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले. शेतकऱ्यांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल ना. दिलीपराव वळसे पाटील साहेब आणि सहकार्य करणाऱ्या सर्व नेत्यांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानण्यात येत आहेत.

आपल्या हक्काच्या पाण्यासाठी आणि शेती वाचवण्यासाठी धामणी व पहाडदरा येथील शेतकऱ्यांनी दिलेल्या लढ्याला अखेर यश येताना दिसत आहे. डिंभे उजव्या कालव्यावर आधारित उपसा जलसिंचन योजनांच्या वीज कनेक्शनचा प्रलंबित प्रश्न आता मार्गी लागणार आहे.

नेमका विषय काय होता?

दुष्काळावर मात करून आपली शेती बारमाही करण्यासाठी धामणी आणि पहाडदरा येथील शेतकऱ्यांनी एकत्र येत डिंभे उजव्या कालव्यावरून तब्बल ९ उपसा जलसिंचन योजना कार्यान्वित केल्या होत्या. यासाठी शेतकऱ्यांनी स्वतःचे कोट्यवधी रुपये खर्च करून पाईपलाईन टाकली होती. मात्र, शासनाच्या जाचक धोरणांमुळे या योजनांना वीज कनेक्शन मिळत नव्हते. परिणामी, हाताशी आलेली पिके जळून जाण्याची आणि शेतकऱ्यांचे भांडवल वाया जाण्याची भीती निर्माण झाली होती.

या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी मा. पंचायत समिती सदस्य रवींद्र करंजखेले आणि सरपंच अक्षयराजे विधाटे यांच्या नेतृत्वाखाली ५ तारखेला एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले. या आंदोलनाची तातडीने दखल ना. दिलीपराव वळसे पाटील आणि मा. शिवाजीराव आढळराव पाटील यांनी घेतली.

## बालकांना अन्नदान व शैक्षणिक साहित्य व फळे वाटप



**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

दि ८ मार्च रोजी छावा श्रमिक संघटना .जिजाऊ प्रतिष्ठान नांदेड व एन टी एस ए च्या विद्यमानेलहुजी साळवे निराधार निराश्रीत बालकांना अन्नदान व शैक्षणिक साहित्य, केळी वाटप करण्यात आले. यावेळी धनगरवाडी चे सरपंच अमीत पगडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) महिला ग्रामीण जिल्हा उपाध्यक्षा सौ. माधुरी हंबर्डे, राम पाटिल वस्तीगृह अधिक्षक साहेबराव गवारकर, पी.एम. गोणेकर, गणेश वाघमारे, अदिची व बालक श्रमातील बालकांची व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक छावा श्रमिक संघटना मराठवाडा अध्यक्ष तथा जिजाऊ प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष भास्कर हंबर्डे व शिवसेना ओबीसी जिल्हाप्रमुख अनिल पाटील धमने यांनी केले होते.

## ठाणे जिल्ह्यात 'उमेद' अभियानाचा सक्षमीकरणाचा प्रवास

**वज्रेश्वरी महोत्सवात 'जिल्हास्तरीय व मिनी सरस विक्री प्रदर्शन' सुरू; नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट द्यावी – जिल्हा प्रशासनाचे आवाहन**

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. स्वयंसहाय्यता समूहातील महिलांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) यांच्या संयुक्त विद्यमाने "जिल्हास्तरीय व मिनी सरस विक्री प्रदर्शन" आयोजित करण्यात आले आहे.

या प्रदर्शनाचे उद्‌घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे रणजित यादव यांच्या हस्ते दि. १० मार्च, २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण मैदान (मॅक्सी ग्राऊंड), कर्णिक रोड, कल्याण, जिल्हा-ठाणे येथे संपन्न झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सांगितले की, जिल्ह्यातील ग्रामीण भागातून सुमारे २०० महिला या प्रदर्शनात सहभागी झाल्या असून १०० स्टॉल्सवर विविध हस्तकला वस्तू, घरगुती उत्पादने व खाद्यपदार्थ विक्रीसाठी उपलब्ध आहेत. महिलांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध व्हावी व त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाच्या सहकार्यामुळे ग्रामीण भागातील महिलांना मोठी बाजारपेठ उपलब्ध होत असून बचत गटातील महिला जागतिक दर्जाचे उत्पादन तयार करण्यासाठी पुढाकार घेत आहेत, असे त्यांनी सांगितले. महिलांच्या कल्पकतेला आणि उमेदीला मर्यादा नसून त्यांच्या जीवनात आर्थिक परिवर्तन घडविणे हेच या उपक्रमाचे मुख्य ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच यादव पुढे म्हणाले की, "उमेद अभियान ग्रामीण महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी कटिबद्ध आहे. महिलांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि 'लखपती दीदी' योजनेद्वारे त्यांचे उत्पन्न वाढवणे हे या अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ठाणे जिल्ह्यातील अधिकाधिक महिला 'लखपती दीदी' होण्यासाठी जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. महिलांचे सक्षमीकरण, व्यवसाय विकास, उत्पादनांची गुणवत्ता, ब्रँडिंग, उत्पन्न वाढ आणि सक्रिय सहभाग यामुळे हे उद्दिष्ट साध्य होऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनास भेट देऊन महिलांना प्रोत्साहन द्यावे." ठाणे जिल्ह्यात ११ हजारांहून अधिक सक्रिय महिला बचत गटांद्वारे सुमारे १ लाखांहून अधिक महिला या अभियानाशी जोडल्या गेल्या आहेत. महिला बचत गटांना संघटनात्मक बळकटी देण्यासाठी सभा, लेखा व्यवस्थापन, कम्युनिटी रिसोर्स पर्सन यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच उद्यम आधार नोंदणी, फूड लायसन्स, बँक लिंकेज, कर्ज व्यवस्थापन व परतफेड यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले जात आहे. या सर्व प्रक्रियेसाठी दशसूत्री कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. याशिवाय "वन स्टेशन – वन प्रोडक्ट" या संकल्पनेअंतर्गत बसस्थानक व रेल्वे स्थानकांवर महिला बचत गटांचे स्टॉल्स उपलब्ध करून देण्यात आले आहेत. तसेच मॉलमध्येही महिला बचत गटांना विक्रीची संधी देण्यात येत आहे. उमेद मार्ट, Amazon यांसारख्या माध्यमांतून डिजिटल मार्केटिंगद्वारेही महिलांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

# जबरी चोरी प्रकरणी दोन जणांना अटक

## १ लाख १०हजारांचा मुद्देमाल जप्त



नांदेड : (समर्थ गांवकरी)

पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण व स्थानिक गुन्हे शाखा, नांदेड यांनी संयुक्तरित्या कारवाई करुन जबरी चोरीचा गंभीर गुन्हा उघड करुन एकुण १,१०,०००/- रुपयेचा मुद्देमाल केला जप्त केला असुन जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी तपास करणाऱ्या पोलीस पथकाचे अभिनंदन केले आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार दि ४ मार्च रोजी वेळ रात्री २ वाजताच्या सुमारास माणिका नागोबा इनकर रा.गंगाबेट ता. जि. नांदेड यांच्या शेतातील आखाड्यावर दोन अनोळखी इसम तोंड बांधुन हातात कत्ते व रॉड घेवून द्रोपदाबाई पि.माणिकराव इनकर वय ६५ वर्ष, माणिका नागोबा इनकर वय ९० वर्ष दोघे रा.गंगाबेट ता.जि.नांदेड यांना झोपेतून उठवुन लाथाबुक्यानी, कत्याने व रॉडने मारहाण करुन गंभीर जखमी केले. तसेच द्रोपदाबाई पि. माणिकराव इनकर यांच्या हातातील चांदीच्या पाटल्या व पायातील चांदीचे वाळे असे चांदीचे दागीने किंमती एकुण १, १०, ०००/- रुपयेचा मुद्देमाल जबरीने घेवुन गेले वगैरे फिर्याद वरुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड, यांनी सदर गुन्हयाचे घटनास्थळी मोजे गंगाबेट येथे भेट देवून सुचना व मार्गदर्शन करुन, सदर मालाविरुध्दचा दाखल गुन्हा उघड करणे बाबत आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने पो.स्टे. नांदेड ग्रामीण येथील गुन्हे शोध पथकातील वरील नमुद पोलीस अधिकारी व अंमलदार हे दोन अनोळखी इसमाचा शोध घेत असताना तपासाचे चक्रे फिरवुन गोपनीय माहितीचे आधारे मौजे विरेगांव ता.जि. जालना येथुन रवि उर्फ मुंडल भास्कर शिंदे वय २० वर्ष, रा. विरेगांव ता.जि. जालना यास अत्यंत शिताफीने व सायबर सेलच्या मदतीने ताब्यात घेवुन त्याचेकडे विचारपुस करुन त्याचे ताब्यातुन वर नमूद चांदीचे दागीने हस्तगत करुन सदरचा गुन्हा उघड केला आहे. सदर गुन्हयातील दुसरा आरोपी नामे भास्कर सायबा शिंदे, वय ५५ वर्ष, रा.विरेगांव ता.जि.जालना यास वरील नमुद स्था.गु.शा.नांदेड येथील पोलोस अधिकारी व अंमलदार यांनी ताब्यात घेवुन पो.स्टे. नांदेड ग्रा. येथे हजर केले. सदर दोन्ही आरोपीतांना कडुन नमुद प्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन दोन्ही आरोपीतांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आले आहे. आरोपीतांना न्यायालयात पोलीस कोठडी कामी हजर करण्यात आले असुन, सदर गुन्हयाचा अधिक तपास सहायक पोलीस निरीक्षक. विजयकुमार कांबळे हे करीत आहेत. सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीचा व गेला मुद्देमालाचा शोध घेणेकामी नांदेड ग्रामीण येथील तिनं टिम व स्थागुशा, नांदेड येथील एक टिम यांनी कामकाज केले आहे.

सदरची उत्कृष्ट कामगीरी करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे अविनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी कौतुक करुन, अभिनंदन केले आहे.

# अहिल्यादेवी महिला ज्येष्ठ नागरिक संघ सिडकोला राज्यस्तरीय जेष्ठ नागरिक संघाच्या प्रथम पुरस्कार

नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)

नाशीक येथे 35 व्या राज्यस्तरीय अधिवेशनात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते नाशिक येथील गायकवाड सभागृहात दरवर्षी देण्यात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिक महासंघ यांच्यावतीने प्रथम राज्यस्तरीय पुरस्कार नांदेड येथील सिडको भागातील अहिल्यादेवी महिला जेष्ठ नागरिक संघ अध्यक्षा भागीरथी मारोतराव बच्चेवार यांना राज्यस्तरीय प्रथम पारितोषक सन्मान चिन्ह,प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

दर तिनं वर्षाला होणारे राज्यस्तरीय 35 वे जेष्ठ अधिवेशन नाशिक येथील गायकवाड सभागृहात 8 व 9 मार्च रोजी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट व जेष्ठ नागरिक संघटनेचे राज्य अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे, उपाध्यक्ष अशोक तेरकर, महिला आघाडीच्या राज्य अध्यक्ष डॉ. निर्मला कोरे,सचिव महामुने , माजी सचिव जयवंत सोमवाड ,सुनिता तेरकर यांच्या सह उतर मराठवाडा विभागीय अध्यक्ष डॉ.हंसराज वैध,राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या अधिवेशना पुर्वी अहिल्यादेवी महिला जेष्ठ नागरिक संघाच्या वतीने गेल्या वर्षभरापासून आरोग्य शिबिर, यांच्या सह जेष्ठ नागरिक मेळावा,ओळख पत्र वाटप यासह अनेक कामे केली व प्रस्ताव राज्यस्तरीय संघटने कडे पाठविण्यात आले होते, उल्लेखनीय कार्याची नोंद घेऊन राज्यस्तरीय अधिवेशन मध्ये अहिल्यादेवी महिला जेष्ठ नागरिक संघाच्या अध्यक्षा भागिरथी बच्चेवार यांना सन्मानित करण्यात आले आहे. हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल जेष्ठ नागरिक महिला व जेष्ठ नागरिक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.



# विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन



नांदेड : (समर्थ गांवकरी)

श्री गुरु गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे 11 ते 17 मार्च 2026 या कालावधीत पिंपळगाव महादेव (ता. अर्धापूर) येथे विशेष निवासी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात सुमारे 100 प्रशिक्षणार्थी सहभागी झाले आहेत.

या शिबिराचे उद्घाटन पिंपळगाव महादेवच्या सरपंच सौ. वर्षा शिवाजीराव खंडागळे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. सुभाष नामदेवराव कल्याणकर (संचालक, भा.च.सं. सा.का. येळेगाव), उपसरपंच उध्दवराव बालासाहेब कल्याणकर, कपील दुधमाने, संस्थेचे प्राचार्य व्ही. डी. कंदलवाड, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती हिंगोले, ग्रामविकास अधिकारी एकनाथ कदम, राम कल्याणकर, गोविंद कल्याणकर तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिबिरार्थी व संस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना प्राचार्य व्ही. डी. कंदलवाड यांनी 'स्वच्छ व हरित भारत' या संकल्पनेवर आधारित या शिबिरामध्ये स्वयंसेवकांच्या माध्यमातून ग्रामस्वच्छतेचे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच अशा निवासी शिबिरांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सेवा भाव, सामाजिक जाणीव आणि जबाबदारीची भावना विकसित होते, असेही त्यांनी नमूद केले. या शिबिरादरम्यान ग्रामस्वच्छता, रस्ते दुरुस्ती, साक्षरतेचे महत्त्व, आरोग्य शिबिर, वृक्षारोपण तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. कार्यक्रमाची रूपरेषा राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी दिनेश पोतदार यांनी स्पष्ट केली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्र. गटनिदेशक मोहन कलंबरकर यांनी केले.

# आर्थिक प्रगतीबरोबरच कला, क्रीडा आणि साहित्य क्षेत्रातील प्रगतीही महत्त्वाची

मुंबई : (समर्थ गांवकरी)

कोणताही समाज कला, क्रीडा आणि साहित्याच्या विकासामुळेच मोठा होत असतो. आर्थिक प्रगतीबरोबरच या क्षेत्रांतील प्रगतीही तितकीच महत्त्वाची आहे. शासनाने प्रदर्शन आणि विविध पुरस्कारांच्या माध्यमातून कला क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली असून पुरस्कारांच्या रकमांमध्येही भरीव वाढ करण्यात आली असल्याचे उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. 65 व्या महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन प्रसंगी ते बोलत होते.

# राष्ट्रपतींच्या हस्ते संगीताबेन देशमुख यांचा सन्मान

डांग गुजरात : (समर्थ गांवकरी)

भारत सरकारच्या जल शक्ति मंत्रालय तर्फे नवी दिल्ली येथे आयोजित जल महोत्सव २०२६ कार्यक्रमात डांग जिल्ह्याने राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय यश मिळवले आहे. डांग जिल्ह्यातील वाघई तालुक्यातील घोडवहळ गावातील पाणी समितीच्या सदस्य संगीताबेन अशोकभाई देशमुख यांना आज राष्ट्रपति श्री मति द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



ग्रामीण भागात जल जीवन मिशन अंतर्गत स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या मोहिमेत "FTK आधारित पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी" या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल संगीताबेन देशमुख यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. या प्रसंगी राष्ट्रपती श्री मति द्रौपदी मुर्मू यांनी सांगितले की, भारतात पाणी ही केवळ मूलभूत सुविधा नसून ती आपल्या संस्कृती आणि उपजीविकेशी जोडलेली आहे. पूर्वी महिलांना पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत होता, परंतु आज जळ जीवन मिशनमुळे प्रत्येक घरापर्यंत स्वच्छ पाणी पोहोचत आहे. त्यांनी जलसंधारणामध्ये महिला बचत गट आणि महिलांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगून जळ महोत्सव हा एक लोकचळवळ असल्याचे नमूद केले.

उल्लेखनीय आहे की डांग जिल्ह्याची भौगोलिक रचना डोंगराळ आहे. जिल्ह्यातील ३११ गावांमध्ये सुमारे २,७३,९४९ लोकसंख्या आहे. जिल्ह्यात स्वजलधारा, राष्ट्रीय ग्रामीण पिण्याचे पाणी योजना आणि जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामस्थांच्या सहभागातून गावांमधील पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्यात आली आहे. गावातील पिण्याच्या पाण्याच्या योजनांची देखभाल व दुरुस्ती ग्रामपंचायत, पाणी समिती आणि ग्रामस्थांच्या सक्रिय सहभागातून केली जाते.

डांग जिल्ह्यात स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी विहिरी, हँडपंप आणि बोरवेलमधील पाण्याचे नमुने घेऊन फील्ड टेस्ट किटद्वारे तपासणी केली जाते. त्यासाठी प्रत्येक गावातील अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षण देण्यात आले असून त्या नियमितपणे पाण्याचे नमुने तपासतात.

विशेष म्हणजे जल शक्ती मंत्रालय तर्फे ८ मार्च ते २२ मार्च दरम्यान देशभरात जल महोत्सव 2026 चे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश जलसुरक्षेबाबत जनसहभाग वाढवणे आणि सामुदायिक मालकी मजबूत करणे हा आहे.

# बदललेल्या नियमांमुळे ग्राहकांच्या लांबच लांब रांगा

डांग-गुजरात : (समर्थ गांवकरी)

डांग जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून घरगुती गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. केंद्र सरकारने १ मार्चपासून गॅस सिलेंडर वितरणासाठी KYC आणि OTP अनिवार्य केल्यानंतर ग्राहक तसेच एजन्सी चालक दोघांसमोरही मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषतः दुर्गम भागातील गरीब आदिवासी कुटुंबांसाठी स्वयंपाकाचा गॅस मिळवणे आता डोकेदुखी ठरत आहे.



डांग सारख्या डोंगराळ आणि दुर्गम भौगोलिक परिस्थिती असलेल्या जिल्ह्यात वाहतूक सुविधाही मर्यादित आहेत. तरीही गृहिणी आणि मजूर गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी ५० ते ६० किलोमीटर दूरवरून टेम्पो किंवा इतर खासगी वाहनाने भाडे खर्च करून आहवा येथील गॅस एजन्सीवर पोहोचत आहेत. अनेक तास रांगेत उभे राहूनही तांत्रिक अडचणींमुळे रिकाम्या हाताने परत जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. एजन्सी संचालकांच्या म्हणण्यानुसार, सरकारच्या नव्या नियमानुसार प्रत्येक ग्राहकाचे KYC अपडेट करणे आणि डिलिव्हरीच्या वेळी OTP पडताळणी करणे अनिवार्य आहे. मात्र डांगच्या दुर्गम भागात मोबाईल नेटवर्क कमकुवत असल्याने आणि कंपनीच्या सर्व्हरमध्ये वारंवार तांत्रिक अडचणी येत असल्याने ही प्रक्रिया अत्यंत संथ गतीने सुरू आहे.

डांग जिल्ह्यात अंदाजे ३८,००० गॅस ग्राहक आहेत. त्यापैकी बहुतांश ग्राहक प्रधानमंत्री उज्ज्वला योजना अंतर्गत नोंदणीकृत आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या कुटुंबांकडे आता स्वयंपाकासाठी लाकूड वापरण्याशिवाय दुसरा पर्याय उरलेला नाही. त्यामुळे गृहिणींना धुरात स्वयंपाक करावा लागत आहे. स्थानिक नागरिक आणि ग्राहकांची सरकारकडे एकच मागणी आहे की, जर KYC आणि OTP इतक्या कडक पद्धतीने लागू करायचे असतील, तर त्याची सुविधा प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करून द्यावी. पंचायत कार्यालयातच ही प्रक्रिया पूर्ण झाली, तर लोकांना उन्हाळ्याच्या कडक उष्णतेत ६० किलोमीटर दूर आहवा येथे जाण्याची गरज भासणार नाही आणि त्यांचा वेळ व पैसा दोन्ही वाचेल.

दरम्यान, एजन्सी संचालकांच्या म्हणण्यानुसार KYC आणि OTP प्रक्रियेसाठी सक्षम सर्व्हर सुविधा उपलब्ध नसणे ही मोठी समस्या ठरत आहे. आता पाहावे लागेल की प्रशासन आदिवासी नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन ही प्रक्रिया सुलभ करते की ग्राहकांना अजूनही रांगेत उभे राहून हालअपेष्टा सहन कराव्या लागतील.

# महाराजांना अभिवादन

मुंबई : (समर्थ गांवकरी)

राज्यपाल पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर पहिल्या दिवशी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी बुधवारी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी महापौर रितू तावडे देखील उपस्थित होत्या. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी त्यानंतर चैत्यभूमी येथे जाऊन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींना अभिवादन केले. यावेळी राज्यपालांच्या उपस्थितीत त्रिशरण बुद्ध वंदना करण्यात आली. मुंबईच्या महापौर रितू तावडे, भन्ते राहुल बोधी महाथेरो, डॉ बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे महासचिव नागसेन कांबळे यावेळी उपस्थित होते. भारतीय बौद्ध महासभेचे प्रताप कांबळे, भिकाजी कांबळे व प्रतीक कांबळे यांनी राज्यपालांना संविधानाची प्रत भेट दिली.

# मोहनराव रोकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा प्रवक्तेपदी; खासदार निलेश लंके यांनी केली निवड जाहीर

पारनेर : (समर्थ गांवकरी)

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरदचंद्र पवार गट) एकनिष्ठ कार्यकर्ते मोहनराव रोकडे यांची अहिल्यानगर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रवक्ते पदावर निवड जाहीर झाली आहे. ही घोषणा पारनेर येथे झालेल्या पक्षाच्या नियोजित बैठकीत खासदार निलेश लंके यांच्या आदेशाने करण्यात आली.



मोहनराव रोकडे हे गेल्या अनेक वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसशी प्रामाणिकपणे जोडले गेले आहेत. पक्ष स्थापनेपासूनच त्यांनी पक्षासाठी अथक परिश्रम केले आहेत. पारनेर तालुक्यातील अति दुर्गम आदिवासी भागात काम करणारे रोकडे सर्वसामान्य जनतेचा नेता म्हणून ओळखले जातात. त्यांचा जिल्हाभर आणि तालुक्यात मोठा जनसंपर्क असून, लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी ते नेहमी तत्पर राहतात.

खासदार निलेश लंके यांच्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीदरम्यान मोहनराव रोकडे यांनी महत्त्वपूर्ण नियोजन आणि भूमिका बजावली होती. खासदार लंके यांच्यासोबतची त्यांची जवळीक, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची पद्धत आणि शरदचंद्र पवार साहेबांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचवण्याची त्यांची सातत्यपूर्ण तळमळ यामुळे त्यांना ही जबाबदारी देण्यात आली आहे. पक्षाच्या या निर्णयाचे पारनेर तालुका आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेतून उत्स्फूर्त स्वागत होत आहे. मोहनराव रोकडे यांच्या जिल्हा प्रवक्तेपदामुळे पक्षाची तळागाळातील ताकद अधिक मजबूत होईल आणि जनतेच्या आवाजाला अधिक प्रभावीपणे मांडता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# शाळा गुणवत्ता मूल्यांकनामध्ये ल ना होशिंग विद्यालयास अ + श्रेणी

(समर्थ गांवकरी)

राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या वतीने माध्यमिक शाळांचे मूल्यांकन करण्यात आले असून सदर मूल्यांकनामध्ये जामखेड येथील ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयस अ+ श्रेणी प्राप्त झालेली असून अ + श्रेणी मिळविणारे हे तालुक्यातील एकमेव विद्यालय ठरले आहे. शाळांची गुणवत्ता उंचावणे, संस्थात्मक सुधारणा करणे आणि पारदर्शकता आणणे या उद्देशाने राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत माध्यमिक शाळांच्या गुणवत्तेचे स्वमुल्यांकन आणि बाह्य मूल्यांकन करण्यासाठी शासनाने एक व्यापक मानकीकृत आराखडा तयार केलेला आहे. त्यानुसार शाळांचे मूल्यांकन करण्यात आले होते. त्यामध्ये अ + श्रेणी मिळवणारे ल. ना. होशिंग विद्यालय हे तालुक्यातील एकमेव विद्यालय ठरले आहे. दि पिपल्स एज्युकेशन सोसायटी या संस्थेची स्थापना 1951 साली झाली व स्थापनेबरोबरच या संस्थेने या विद्यालयाची सुरुवात केली. संस्थेच्या अमृत महोत्सवी वर्षां मध्ये हे यश मिळवून ल. ना. होशिंग विद्यालयाने संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ल. ना. होशिंग विद्यालय हे केवळ एक विद्यालय न राहता तालुक्यातील माध्यमिक शिक्षणासाठीचे मार्गदर्शन केंद्र झालेले आहे. तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळांना मार्गदर्शन करणे त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याचे काम हे विद्यालय अनेक वर्षापासून सातत्याने करीत आलेले आहे. विद्यालयात अनेक नवनवीन उपक्रम राबविले जातात व ते तालुक्यातील माध्यमिक शाळांसाठी प्रेरक ठरत आहेत.

# बालविवाह करणे हा कायद्याने गुन्हा : न्यायाधीश राऊत

## माहिजळगावात बालविवाह प्रतिबंधक कायद्यासंदर्भात जनजागृती कार्यक्रम

कर्जत : (समर्थ गांवकरी)

बालविवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे. बाल संरक्षणाबाबत अस्तित्वात असलेल्या कायद्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. बालविवाह रोखणे ही समाजातील प्रत्येकाची जबाबदारी असून प्रत्येक घटकाने जागरूक राहून आपले कर्तव्य पार पाडणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन कर्जत दिवाणी व फौजदारी न्यायालयाचे न्यायाधीश रामराव राऊत यांनी केले.



राज्यात शासनाने बालविवाह कायद्याच्या जनजागृतीसाठी शंभर दिवसांचा विशेष कार्यक्रम हाती घेतला आहे.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई अंतर्गत आयोजित कार्यक्रमाच्या अनुषंगाने कर्जत तालुका वकील संघ आणि तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील माहिजळगाव येथे श्री.विठ्ठल विद्यालयात 'बाल विवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत कायदेविषयक जनजागृती शिबिर नुकतेच पार पडले. या कार्यक्रमाप्रसंगी कायदेविषयक मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गजेंद्र जगताप हे होते.

या कार्यक्रमास कर्जत तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. संग्राम ढेरे, उपाध्यक्ष ॲड.दत्तात्रय चव्हाण, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.कैलास शेवाळे, ॲड.आनंद साळवे, ॲड. स्वप्निल सुर्यवंशी, ॲड.प्रविण पवार यांच्यासह न्यायालयीन कर्मचारी आदी प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बालविवाह रोखण्यासाठी विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनींना शपथ देण्यात आली.

या शिबिराच्या माध्यमातून उपस्थित ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांना बालविवाह प्रतिबंधक कायद्याची सविस्तर माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

यावेळी अध्यक्ष ॲड.ढेरे, ॲड. शेवाळे व उपाध्यक्ष ॲड.चव्हाण कायद्याविषयी विशेष माहिती दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड.आनंद साळवे यांनी केले. तर आभार ॲड.भरत झिंजे यांनी मानले...